रायगड, बुधवार, दि. २४ एप्रिल २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹




(छायाचित्र : समीर मालोदे)

# मोदींच्या हुकूमशाहीला गाडून टाका

**। रायगड/अलिबाग । प्रतिनिधी ।**
देशासह परदेशातील नेत्यांना भारतामध्ये मोदींच्या रुपाने हुकूमशाही येण्याची चिंता वाटत आहे. मात्र, डॉ. बाबासाहेबांनी आपल्या देशाला दिलेली घटना एवढी भक्कम आहे की, तसे धाडस कोणी करणार नाही. हुकूमशाही प्रवृत्तीला गाडून टाकण्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. पान ३ वर

**शरद पवारांचे मतदारांना आवाहन** | **गीतेंच्या विजयाचा मोर्ब्यात निर्धार**



## जनताच तटकरेंना रायगडातून तडिपार करणार : अनंत गीते

आजची सभा पाहिली, सभेचा जोश पाहिला तर मैदान तर खचाखच भरले असून, अनेकांना आत यायलासुद्धा जागा नाही. हे चित्र पाहून मला असं वाटलं, की ही माझ्या प्रचाराची सभा नसून, विजयाची सभा आहे, असा विश्वास अनंत गीतेंनी व्यक्त केला. पवारसाहेब हा निर्धार येथील जनतेने केलाय की, आपकी बार तटकरेंना तडिपार करुन अनंत गीतेंना किमान दोन लाखांच्या फरकाने विजयी करणार, असे गीतेंनी पवारांना सांगितले.



गीते म्हणाले, मी मूळ शिवसैनिक असलो, तरी माझी उमेदवारी उद्धवसाहेबांकडे पवारसाहेबांनी मागितली. आणि, माझ्या उमेदवाराची घोषणा आ. जयंत पाटील यांनी श्रीवर्धनमध्ये चार महिन्यांपूर्वी केली. देशाची लोकशाही अबाधित राहण्यासाठी, संविधान वाचविण्यासाठी इंडिया आघाडीची सत्ता येणे गरजेचे आहे. पान ३ वर

## नारायण नागू पाटलांच्या आठवणींना उजाळा

**सत्ताधारी म्हणतात त्यांच्याकडे प्रधानमंत्री म्हणून मोदींचा चेहरा आहे. परंतु, त्यांना सांगा देशातील १४० कोटी जनता आमच्यासोबत आहे, असे पवार म्हणाले. रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील, दत्ता पाटील, मीनाक्षी पाटील यांनी केलेल्या कार्याची तुलना होऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात अनेक विकासकामे केली असल्याचे सांगत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.**

## गद्दारोंको खुद्दारीसे हरायेंगे : सुषमा अंधारे

शेतकरी कामगार पक्षाचे नेते आ. जयंत पाटील यांनी सुनील तटकरे यांना पाठिंबा दिला, त्यामुळे तटकरे खासदार झाले. शरद पवार यांचा शब्द मानून आ. जयंत पाटील यांनी तटकरेंच्या मुलीला जिल्हा परिषद अध्यक्ष बनवले. मात्र, त्याच जयंत पाटील यांच्याशी सुनील तटकरे यांनी गद्दारी केली. शरद पवार यांनी तटकरेंना खूप मोठे केले. पण, त्यांच्यासोबत गद्दारी करण्याचे काम तटकरे यांनी केले आहे. या तटकरेंना जागा दाखवण्याची वेळ आली आहे, असे अंधारे म्हणाल्या.



शरद पवार यांची साथ होती. तोपर्यंत सुनील तटकरे यांना मान होता. ही लढाई खुद्दार विरुद्ध गद्दार अशी असणार आहे. ही लढाई अस्तित्वाची असून, तुमच्या-आमच्या हक्काची असणार आहे, असेही अंधारे यांनी सांगितले.

सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, ही लढाई महिला सुरक्षेसाठी, शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या भावाची, शेतकऱ्यांच्या हितासाठी असणार आहे.

देशात जाती-जातीमध्ये वाद निर्माण करणे, बेरोजगारी, महिला असुरक्षिता, महागाई प्रचंड आहे. या निवडणुकीत अन्यायाविरोधात मशाल पेटवण्यासाठी सज्ज व्हा, विजयाची तुतारी वाजवण्यासाठी सैनिक तयार झाला आहे. या निवडणुकीत तटकरे यांना गुलाल उधळण्यास मिळणार नाही, असा टोला उपनेत्या सुषमा अंधारे यांनी तटकरेंना लगावला.

## तटकरेंचा पराभव करण्याची ताकद मुस्लिमांमध्येच

- शिवसेनेच्या अनंत गीते यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणा
- शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांचे आवाहन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
मुस्लिम समाजाने नेहमीच शेकापला साथ दिली आहे. आताच्या निवडणुकीत सुनील तटकरेंचा नायनाट करण्याची ताकद ही मुस्लिम समाजामध्येच आहे. इंडिया आघाडीतील शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते यांना मोठ्या संख्येने मतदान करुन निवडून आणावे, असे आवाहन शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी केले.

रायगड जिल्ह्यात शेकापची प्रचंड ताकद आहे. त्यामुळे राज्यात सर्वाधिक मताने विजयी उमेदवार म्हणून निवडून येणारे जायंट किलर ठरणार आहेत. आमची सभा असल्याचा धसका त्यांनी घेतला आहे. यासाठीच त्यांनी याच ठिकाणी सभा लावली आहे. हिम्मत असेल तर आमच्या व्यासपीठावर या आणि मुस्लिम समाजासाठी कोणी किती काम केले हे सांगा, असे आवाहनही आमदार पाटील यांनी केले. पान ३ वर

### सत्तेचा वापर, प्रशासनावर दबाव

**इंडिया आघाडीच्या सभेची परवानगी पंधरा दिवसांपूर्वी घेण्यात आली होती. त्यावेळी सायंकाळी ४ ते १० अशी वेळ प्रशासनाकडून देण्यात आली होती. मात्र, सुनील तटकरे यांनी सत्तेचा गैरवापर करीत प्रशासनावर दबाव टाकून सकाळी दहा वाजता आयोजित केलेली सभा इंडिया आघाडीच्या सभेवेळीच आणि जवळच घेतली. हा आचारसंहितेचा भंग असून, त्याबाबत प्रशासनाला जाब न विचारता आगामी निवडणुकीच्या निकालातून उत्तर देऊ, असे जयंत पाटील यांनी सांगितले.**



## संजोग वाघेरे-पाटलांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग भिकू वाघेरे (पाटील) यांनी मंगळवारी (दि.२३) हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर वाजत गाजत आपला उमेदवारी अर्ज भरला.

प्रथम काळभैरव मंदिरात दर्शन घेऊन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून साई



चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक यांना अभिवादन करून चिंचवड गाव मोरया गोसावी गणपती मंदिर पान ५ वर

## मैदानासाठी राडा!

### बच्चू कडू आणि पोलिसांमध्ये बाचाबाची

**। अमरावती । प्रतिनिधी ।**
प्रहार पक्षाचे उमेदवार दिनेश बूब यांच्या प्रचार सभेसाठी आमदार बच्चू कडू यांनी अमरावतीमधील सायन्स कोर मैदान २४ तारखेसाठी बुक केले होते. त्यासाठी त्यांनी संबंधित शुल्कही भरले होते. दरम्यान, मंगळवारी पान ५ वर







**महालक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र कासू/पेण/रायगड**
कासू रेल्वे स्टेशनजवळ चालवायला देणे आहे.
इच्छुकांनी संपर्क साधावा :
मोहन वेखंडे - ९८५००१५२०१/८१४९४८०८४८
सुविधा १५ रुम + स्विमिंग पूल/रेनडान्स, गार्डन एरिया, किचन-२/चुल. कॉन्फरन्स हॉल + ओपन रेस्टॉरंट, टॉप फ्लोअर, रिसेप्शन, कार्यक्रम हॉल + लॉन एरिया, मोठा पार्किंग एरिया + प्लेग्राऊंड सोबत विविध सुविधा उपलब्ध.

## अटकेच्या भीतीमुळेच फडणवीसांची फोडाफोडी

### संजय राऊत यांचा हल्लाबोल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महाविकास आघाडी सरकार देवेंद्र फडणवीस यांना अटक करणार होते, असे वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी चांगलाच समाचार घेतला आहे. तसेच सूरत येथे भाजपचा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. हा भाजपाचा विजय नसून, लोकशाहीचे वस्त्रहरण आहे, अशा शब्दांत संजय राऊत यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे.



सरकार कोणलाही विनाकारण अटक करत नाही, गुन्हेगार कितीही मोठा असला तर कायद्यासमोर सर्व समान आहेत, असे शिंदे यांचे दिल्लीतील बॉस नरेंद्र मोदी यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच मोदी सरकारने झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि अनेक मंत्र्यांना अटक केली. पान ५ वर

## श्रमिकांनी जिंकला लढा

### हातरिक्षा चालकांना ई-रिक्षाचे परवाने; न्यायालयाचा निर्णय

**। माथेरान । वार्ताहर ।**
मागील एका तपापासून पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरू होऊन सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी गावातील त्याचप्रमाणे अन्य मंडळींच्या लढ्याला अखेर यश आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पहिल्या टप्प्यात वीस स्थानिक हातरिक्षा चालकांना परवानगी दिली असून, लवकरच त्यांच्या हाती ई-रिक्षाचे स्टिअरिंग येणार आहे. कष्टकरी श्रमिकांच्या संघर्षाला मिळालेले हे अद्‌भूत यश मिळाल्याने हातरिक्षा चालकांनी समाधान व्यक्त करीत न्यायालयाचे आभार मानले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १० पान ५ वर



**हात रिक्षाचालकांना ई-रिक्षाची परवानगी दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे मनःपूर्वक धन्यवाद. माथेरानच्या तीव्र चढ-उताराच्या रस्त्यावर हातरिक्षा ओढताना मला माझ्या वाढत्या वयोमानानुसार प्रचंड दमछाक व्हायची. ई-रिक्षामुळे आमचे आर्थिक परिस्थितीसह आरोग्यसुद्धा निश्चितच सुधारेल.**
**– अंबालाल वाघेला,** हातरिक्षा चालक, माथेरान






## वे|ध|क

### कोल्हापुरात दुरंगी लढत

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील लोकसभेच्या दोन्ही मतदारसंघात काल नऊ उमेदवारांनी माघार घेतल्याने राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. कोल्हापूर मतदारसंघातून चौघांनी, तर हातकणंगले मतदारसंघातून पाच जणांनी माघार घेतली. त्यामुळे कोल्हापुरात दुरंगी तर हातकणंगलेत चौरंगी लाढत होणार आहे. सोमवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. यावेळी कोल्हापूर मतदारसंघातून २३ उमेदवार रिंगणात आहेत. येथे काँग्रेसचे श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आणि शिवसेनेचे संजय मंडलिक यांच्यात प्रमुख लढत होणार आहे.

### हातकणंगलेत चौरंगी लढत

**कोल्हापूर :** काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव बाजीराव खाडे आपली बंडखोरी कायम ठेवत अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. हातकणंगले मतदारसंघात अपक्ष उमेदवार धैर्यशील संभाजीराव माने, वेदांतिका धैर्यशील माने, बाबासाहेब यशवंत पाटील, शिवाजी विठ्ठल माने आणि सुनील विलास अपराध यांनी माघार घेतली. त्यामुळे हातकणंगले मतदारसंघातून २७ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये धैर्यशील माने, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आ. सत्यजित पाटील, राजू शेट्टी, डी. सी. पाटील यांच्यात प्रमुख लढत होणार आहे.

### सामान्यांचे प्रश्न गायब

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या सर्वपक्षीय प्रचाराचा रथ भरकटला असून सामान्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न आणि विकासाचे मुद्दे मागे पडत चालले आहेत. 'अब की बार चार सौ पार' ची घोषणा देणाऱ्या भाजपने ध्रुवीकरणाचा हुक्मी एक्का काढल्यानंतर विरोधकांनीही सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठविली आहे.काँग्रेस जनतेच्या ताब्यातील संपत्ती हिसकावून घेत ज्यांना जास्त मुले आहेत त्यांना तिचे वाटप करणार असल्याचे विधान पंतप्रधानांनी राजस्थानातील सभेत केल्यानंतर विरोधक संतापले आहेत. त्यामुळे सामान्यांचे प्रश्न गायब झाले आहेत.

# 'राष्ट्रासाठी मोदींचा पराभव गरजेचा'

## अमरावतीचे महाविकास आघाडीचा प्रचार

**। अमरावती । प्रतिनिधी ।**

आज भारताच्या शेजारील राष्ट्रांची परिस्थिती अतिशय विदारक झालेली आहे. तेथील राज्यघटना कमकुवत पडल्याने ही अवस्था निर्माण झाली आहे. केंद्रातील मोदी सरकारकडून डॉ. बाबाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला नख लावण्याचा प्रयत्न होत असून संविधान वाचविण्यासाठी तसेच भारताला मजबूत राष्ट्र बनविण्यासाठी मोदींचा पराभव आवश्यक आहे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी सोमवारी(दि.२२) अमरावती येथे केले.

अमरावतीचे महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखडे यांच्या प्रचारार्थ स्थानिक संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत



होते. मागील दहा वर्षांच्या सत्ताकाळात देशात तुमची सत्ता आहे. त्यामुळे तुम्ही देशासाठी काय केले ते सांगण्याची गरज असताना तुम्ही मात्र, काँग्रेसने ७० वर्षांत काय केले, असा प्रश्न उपस्थित करून देशातील जनतेची फसवणूक करीत आहात, असे पवार म्हणाले. देशातील संसदीय लोकशाही धोक्यात आली असून देशातील विद्यमान सरकारचा पराभव करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस मुकुल वासनिक, मिलिंद नार्वेकर, अनिल देशमुख, आ. मुजफ्फर हुसैन, डॉ. सुनील देशमुख, बबलू देशमुख, अनंत गुढे, उमेदवार बळवंत वानखडे, विलास इंगोले, बबलू शेखावत, सुधीर सूर्यवंशी, सुनील खराटे, पराग गुडधे, लक्ष्मी शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### देशात सरकारविरोधी लाट

**देशात पहिल्यांदाच सरकारविरोधात मोठी असंतोषाची लाट निर्माण झाली आहे. आणीबाणीनंतर ज्याप्रमाणे देशात सरकारविरोधात लाट होती तशीच परिस्थिती आज देशात आहे. मोदींची गॅरंटी ही विकासाची नसून भ्रष्टाचाऱ्यांना अभय देणारी आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.**

### एकदा चूक केली

**मागील वेळी आपण अमरावती लोकसभा मतदारसंघात सध्याच्या खासदारांना मते देण्याचे आवाहन करून मोठी घोडचूक केली होती, त्याचे परिणाम आजही दिसून येत आहेत. त्यामुळे ही चूक सुधारण्यासाठी आता आपण येथे आल्याचे शरद पवार यांनी सांगितले. अशी चूक परत होणार नाही, असेही ते म्हणाले.**

# नाशिकमध्ये सामसूम; दिंडोरीत धामधूम

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

नाशिक मतदारसंघात महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाली असून, महायुतीची उमेदवारी अद्यापही निश्चित झालेली नाही. दुसरीकडे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महायुती, महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर, माकप, वंचित बहुजन आघाडीसह अपक्ष उमेदवारांच्या उड्या पडत आहेत.

माजी खा. हरिश्चंद्र चव्हाण बंडखोरी करण्याच्या तयारीत असून माकपही उमेदवारीवर ठाम आहे. वंचितनेही उमेदवारीत बदल करीत, मालती थविल यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे मतदारसंघात पंचरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

दिंडोरी मतदारसंघात महायुतीने केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांना पुन्हा उमेदवारी देत रिंगणात उतरविले आहे.

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भास्कर भगरे यांना उमेदवारी दिली आहे.भाजपने डॉ. पवार यांनी उमेदवारी दिल्याने माजी खा. चव्हाण नाराज झाले असून डॉ. पवार यांच्यावर मतदारसंघात नाराजी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून रिंगणात उतरण्याची तयारी केली आहे.

दिंडोरीचे राजकारण तापलेले असतानाच प्रकाश आंबेडकर यांनी दिंडोरीचा उमेदवार बदलला आहे. त्यामुळे या मतदारसंघातून नक्की कोण बाजी मारणार हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

# बजरंग सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। बीड । प्रतिनिधी ।**

'राज्य घटना वाचविण्यासाठी देशात लाट निर्माण झाली आहे. राज्यात महाविकास आघाडी ३२ ते ३५ जागा जिंकेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज सादर केला. त्यानंतर महाविकास आघाडीची सभा झाली. त्यात पाटील म्हणाले, आमच्याकडे नेते जास्त नाहीत, पण जनता आमच्याकडे आहे. सलग पंधरा वर्षे भाजपची सत्ता असताना ते



जिल्ह्याचा विकास करू शकले नाहीत. जिल्ह्यातील जनतेने दिलेल्या जबाबदारी भाजप पेलू शकला नाही.जीएसटीने शेतकरी शेतमजूर आणि सामान्य जनता हैराण झाली आहे. आतापर्यंत देशात काँग्रेस आणि समविचारी पक्षांनी केलेल्या विकासाला शून्य ठरविण्याचे कटकारस्थान पंतप्रधान मोदी करीत आहेत. भाजपच्या नेत्यांनी टीकाटिपणी करण्यापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर बोलावे, असे आव्हान त्यांनी दिले.


## ओपिनिअन पोलमुळे मतदान घटले

**मुंबई :** लोकसभेचा पहिला टप्पा १९ एप्रिलला पार पडला. सोशल मीडिया, एसएमएस, फोन आदींवरून राजकीय पक्षांनी प्रचार केला. याचबरोबर निवडणूक आयोगानेही तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. राजकीय पक्षांची धाकधूक वाढलेली असताना आयोगाने उरलेल्या टप्प्यांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी नवीन तयारी सुरु केली आहे. या लोकसभेला पहिल्या टप्प्यातील मतदानामध्ये तीन टक्क्यांची घट दिसून आली आहे.

# औरंगाबादमधून भुमरे यांना उमेदवारी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

औरंगाबाद मतदारसंघातून शिवसेनेच्या शिंदे गटाने रोजगार हमी योजना आणि फलोत्पादनमंत्री संदीपान भुमरे यांची उमेदवारी अखेर जाहीर केली. हा मतदारसंघ शिवसेनेकडे कायम राहिल्याने गेली दीड वर्षे निवडणूक लढण्याची तयारी केलेले केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या



मेहनतीवर पाणी फेरले गेले.

औरंगाबादचा प्रश्न सुटला असला तरी ठाणे, नाशिक, पालघर आणि दक्षिण मुंबई या मतदारसंघांचा तिढा अद्यापही सुटू शकलेला नाही.

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघावरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. गेली दीड वर्षे या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी तयारी सुरू केली होती. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औरंगाबाद सोडण्यास नकार दिल्याने शेवटी भाजपला हट्ट सोडून द्यावा लागला. शिवसेनेच्या ठाकरे गटाने ओबीसी समाजातील चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी दिल्याच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाने भुमरे यांना उमेदवारी देऊन 'मराठा कार्ड' खेळले आहे.

# नाशिकमध्ये 'वंचित'तर्फे करण गायकर उमेदवार

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

वंचित बहुजन आघाडीतर्फे नाशिक लोकसभा मतदारसंघात सकल मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक करण गायकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. महाविकास आघाडीने राजाभाऊ वाजे यांना मैदानात उतरवले आहे. तर महायुतीच्या उमेदवारीचा घोळ कायम आहे. मविआनंतर वंचितनेही मराठा समाजातील व्यक्तीला उमेदवारी दिली आहे.



वंचित बहुजन आघाडीने नाशिक आणि जळगाव या दोन मतदारसंघातील उमेदवारांची नावे जाहीर केली. गायकर यांनी अलीकडेच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांची अकोला येथे भेट घेतली होती. त्यावेळी नाशिक लोकसभेच्या जागेबाबत सखोल चर्चा झाली होती. वंचिततर्फे गायकर यांना उमेदवारी देण्याचे जवळपास निश्चित झाले होते. त्याची अधिकृत घोषणा पक्षातर्फे करण्यात आली. मराठा आरक्षणाच्या लढ्यासह विविध आंदोलनात गायकर हे सक्रिय होते.

## मावळमध्ये तिरंगी लढत

**पिंपरी :** मावळ लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. वंचित बहुजन आघाडीने मावळमधून माधवी जोशी यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मावळ, मतदारसंघाठी गुरुवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. कर्जत येथील माधवी जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीकडून संजोग वाघेरे माधवी जोशी यांच्या उमेदवारीमुळे तिरंगी लढत होणार आहे.

# अजित पवार गटाला धक्का;शिवा मोहोड शिवबंधनात

**। अकोला । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूकीच्या रणधुमाळीला वेग आला असताना अचानक अजित पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. आमदार अमोल मिटकरी यांच्या दबावाला कंटाळून शहर आणि ग्रामीणमध्ये आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर कमी वयात अनेक राजकीय पदे भूषविणारे शिवा मोहोड यांनी अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

सोमवारी (दि.२२ ) रोजी अमरावती येथील एका कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्यांनी शिवबंधन बांधले.

दरम्यान, त्यांनी आ. अमोल



मिटकरी यांच्यावर गंभीर आरोप सुद्धा केले आहेत. मिटकरींना असेच पाठीशी घातले तर अनेक जण रामराम ठोकतील असा इशाराही दिला आहे.

तेथे त्यांच्या आजपर्यंतच्या कार्याची योग्य दखल आमदाराच्या दबावामुळे घेतल्या गेली नाही. शिवाय ज्यांच्यात कोणतीही निवडणूक लढविण्याची किंवा निवडून येण्याची क्षमता नाही अशा लोकप्रतिनिधींमुळे त्यांना अनेक खोट्या आरोपांना आणि अडचणींना सामोरे जावे लागले. विकास निधीमध्ये अडथळे येऊ लागले, असे सांगून त्यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती.

त्यानंतर ते कोणत्या पक्षात जातात याकडे लक्ष लागले होते. अखेर सोमवारी त्यांनी अमरावती येथील एका जाहीर कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत खा. अरविंद सावंत, जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश शिरवाडकर यांच्या मार्गदर्शनात तसेच आ. नितीन देशमुख व जिल्हा प्रमुख गोपाल दातकर, शहर प्रमुख राहुल कराळे यांच्या नेतृत्वात शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशामुळे आता शहरी व ग्रामीण भागात शिवसेना उबाठा पक्षाची ताकद आणखी वाढणार असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# नेत्यांच्या सभांचा धुरळा, उमेदवारांची दमछाक

**। वर्धा । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या आठ मतदारसंघांमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. आता जाहीर प्रचारासाठी मंगळवार आणि बुधवार हे दोनच दिवस उरले आहेत. बुधवारी सायंकाळी प्रचार तोफा थंडावणार असल्याने उमेदवारांची जनसंपर्कासाठी धावपळ सुरू आहे. धाकधूक वाढली, काय होणार? मतदानाचा दिवस जवळ येत असल्याने सर्वच उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. नेत्यांच्या सभांना मिळणारा प्रतिसाद बघून विजय, पराजयाचे दावे केले जात आहे. मतदार केवळ नेत्यांचे भाषण ऐकण्यात दंग आहेत. त्यांनी अद्याप आपले पत्ते उघड केले नाहीत. त्यामुळे नेत्यांसह त्यांच्या कार्यकर्त्यांची धाकधूक दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. जास्तीतजास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी कसरत आठही लोकसभा मतदारसंघांमध्ये नेत्यांच्या सभांचा धुरळा उडत आहे. दररोज कुठे ना कुठे सभा होत आहेत. त्यामुळे खुद्द उमेदवारांचीही दमछाक होताना दिसून येत आहे. बुधवारी सायंकाळी प्रचार थांबल्यानंतर मूक प्रचाराला सुरुवात होईल. तत्पूर्वी विविध नेत्यांना आपल्या मतदारसंघात आणून मतदारांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न करताना उमेदवार दिसून येत आहे. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील नेत्यांना मतदारसंघात पाचारण केले जात आहे. एक सभा होण्यापूर्वीच उमेदवारांना दुसऱ्या नेत्यांच्या सभेला धावपळ करत पोहोचावे लागत आहे.

# भाजपला नकोसे मुद्दे

## राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जातनिहाय जनगणना आणि शेतकऱ्यांना किमान आधार मूल्य या भाजपला नकोशा मुद्द्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे. महायुतीत लोकसभेच्या चार जागा लढणाऱ्या अजित पवार गटाच्या जाहीरनाम्याचे नाव ङ्गराष्ट्रासाठी राष्ट्रवादीफ असे ठेवण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, पक्षाचे प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आदी नेत्यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.२२) मुंबईत जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. किमान आधार मूल्य हा शेतकऱ्यांचा हक्क आहे व त्याची जपणूक करू, असे आश्वासन जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. याबरोबरच जातनिहाय जनगणना व्हावी हा आमचा आग्रह राहील, असेही नमूद करण्यात आले आहे. भाजपच्या भूमिकेला छेद देणारा मार्ग अजित पवार गटाने स्वीकारल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे.

# मतदानाच्या जनजागृतीसाठी 'वासुदेव'

**। वसई । प्रतिनिधी ।**

लोकशाही टिकवा, मतदान करा असा संदेश देत आता वासुदेव वसई विरार शहरातील रस्त्यावर आणि नाक्यांवर फिरत आहे. लोकसभा निवडणुकीसाठी अधिकाधिक नागरिकांनी मतदान करावे यासाठी वसई विरार महापालिकेने जनजागृती सुरू केली आहे.

वासुदेव आणि महाराष्ट्राचे एक वेगळं नातं आहे. डोक्यावर मोरपिसांची टोपी, हातात टाळ आणि तोंडात संतांचे अभंग असं लोभसवाणं रुप घेऊन वासुदेव नेहमी शहरांत-गावात सकाळी फिरत असतो.



वंशपरंपरागत हा भिक्षुकीचा व्यवसाय करणाऱ्या वासुदेवाचे दर्शन आजही अधूनमधून होत असते. अशाच एका वासुदेवाचे दर्शन सध्या वसई विरार परिसरात सध्या सर्वांना होताना दिसत आहे. पूर्वीच्या काळात वासुदेव घरधनीच्या पित्तरांचे गोडवे गात प्रभुनामाची लोकगीते गात असे. वसईत दिसणारा हा वासुदेव मात्र, लोकशाहीचा जागर करतोय. लोकशाही टिकविण्यासाठी मतदान करा, असे आवाहन हा वासुदेव लोकांना करत आहेत.

# 'अजितदादांचा पराभव केल्याशिवाय माढ्याला परतणार नाही'

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बारामती लोकसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून आहे. पहिल्यांदाच पवार कुटुंबातील दोन व्यक्ती एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. एकीकडे अजित पवार यांनी आपली संपूर्ण ताकद बारामतीत लावली आहे. तर दुसरीकडे शरद पवारही मागे नाहीत. त्यांनीही आपले डावपेच आखायला सुरुवात केली आहे. माढा लोकसभेचे गणित बसवताना धनगर समाजाचे नेते उत्तमराव जानकर यांनी आपल्याकडे वळवण्यात यश आले होते.

जानकर आता बारामतीत सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. त्यांनी थेट अजित पवार यांनाच आव्हान दिलं आहे.

अजित पवार यांच्या पक्षाचा पहिला जो स्टॅम्प द्यावा लागतो, तो मी दिला असून मी परवा माझ्या भाषणात सांगितले की, अजित पवारांचा पराभव केल्याशिवाय मी माढ्याला परत येणार नाही. शरद पवार साहेबांचे घड्याळ चोरून नेले आहे. ते अजित पवारांच्या पराभवाशिवाय साहेबांच्या पायावर येऊ शकत नाही असे ते यावेळी म्हणाले. अजित पवारांना देखील याच तालुक्यात पाल ठोकून ठेवायचं असा डाव भाजपचा असल्याचा आरोप उत्तमराव जानकर यांनी केला आहे. ते इंदापूर तालुक्यातील लाखेवाडी येथे सभेत बोलत होते.

## सोलापुरात वंचितची माघार

**। सोलापुर । प्रतिनिधी ।**

सोलापुरात वंचितच्या उमेदवाराने माघार घेतली आहे. यामुळे भाजपची डोकेदुखी वाढू शकते तर काँग्रेसला दिलासा मिळू शकतो. काही उमेदवारीवरून वाद झाला असताना वंचितच्या दोन उमेदवारांनी आता माघार घेतली आहे. भाजपला फायदा होऊ नये, यासाठी सोलापूरचा उमेदवार राहुल गायकवाड यांनी माघार घेतली आहे. सोलापूरमधील वंचितच्या उमेदवाराने घेतलेली माघार ही काँग्रेससाठी फायद्याची तर भाजपसाठी डोकेदुखी ठरू शकते. कारण २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत एमआयएम वंचितच्या युतीने घेतलेल्या मतामुळे भाजपचा विजय सोपा झाला होता.

# ठाणे लोकसभेच्या जागेत संभ्रम कायम

## ■ उमेदवार अनिश्चितीमुळे महायुतीचा प्रचार थंडावला

**। भाईंदर । प्रतिनिधी ।**

ठाणे लोकसभा जागेसाठी महायुतीचा उमेदवार निश्चित होत नसल्यामुळे भाजप-शिवसेना पक्षांअंतर्गत संभ्रम वाढू लागला आहे. त्यामुळे शनिवार-रविवार या सुट्टीच्या दिवशी मिरा भाईंदर शहरातील प्रचार थंडावल्याचे दिसून आला.

लोकसभा निवडणुकीचे पहिल्या टप्प्यातील मतदान पार पाडल्यानंतरही महायुतीमधील जागा वाटपाचा तिढा सुटू शकलेला नाही. शिवसेना आणि भाजपा या दोन्ही पक्षांकडून ठाणे मतदारसंघावर दावा सांगितला जात आहे. भाजपाने दावा करून संजीव नाईक यांचे नाव पुढे केले होते. त्यांनी प्रचारदेखील



सुरू केला होता. नंतर शिवसेनेतर्फे प्रताप सरनाईक यांचे नाव समोर आले. पण त्याची देखील अधिकृत घोषणा झाली नाही. दोन्ही पक्षांच्या या रस्सीखेचामुळे मिरा भाईंदर शहरातील महायुतीचा प्रचार थंडावला आहे. सुरवातीला नरेंद्र मोदी यांना उमेदवार समजून प्रचार करण्यात येत होता. मात्र, आता उमेदवाराबाबत एवढी अनिश्चितता निर्माण झाल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला आहे. परिणामी महायुतीचा प्रचार थंडावत गेला.

### महाविकास आघाडी जोरात

**महायुतीचा उमेदवार ठरत नसल्याने त्यांचा प्रचार थंडावला असला तरी दुसरीकडे हाविकास आधाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी हा मतदार संघ पिंजून काढला असून अन्य पक्षातील नाराज उमेदवारांना आपल्या पक्षात घेण्याचा सपाटा सुरु ठेवला आहे. महायुती मध्ये उमेदवारीवरून सुरु असलेल्या वादामुळे अंतर्गत गटातटाचे राजकारण महायुतीला हानीकारक ठरू शकेल अशी शक्यता राजकीय विश्लेषकांकडून वर्तविण्यात येत आहे.**

## धाराशिवमध्ये ३१ उमेदवार आखाड्यात

**धाराशिव :** सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी चार उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. महायुतीचे डमी उमेदवार शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्यासह तीन अपक्ष उमेदवारांचा यात समावेश आहे. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या इतिहासात पहिल्यांदा सर्वाधिक ३१ उमेदवार निवडणुकीला सामोरे जात आहेत. यापूर्वी २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत २८ उमेदवार रिंगणात उतरले होते. उमेदवारांची संख्या वाढल्यामुळे मतविभागणीचा फटका नेमका कोणाला बसणार? यावर जय-पराजयाचे समीकरण विसंबून असणार असणार आहे.



# भाजप हटाव, संविधान बचाव : उल्का महाजन

रायगडची भूमी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कर्मभूमी ओळखली जाते. रायगडात होत असलेली आजची सभा महत्त्वाची आहे. भाजपला हटविण्यासाठी आम्ही सज्ज झालो आहोत. लोकशाही वाचवायची असेल, संविधान टिकवायचे असेल, तर भाजपला सत्तेतून हटविणे गरजेचे आहे, असा निर्धार सर्वहारा जनआंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन यांनी केला.

भाजपला सत्तेतून पायउतार करण्यासाठी देशातील सर्वच मतदारसंघातील जनता एकवटल्याचे चित्र असून, रायगड मतदारसंघही त्यापैकी एक आहे. भाजपकडून ज्यापप्राकरे द्वेषाचे राजकारण सुरू आहे, ते संपविण्याची गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दूरदृष्टी, निष्ठा, अथक परिश्रमातून संविधानची निर्मिती केली, आधुनिक भारताचा रोड मॅप तयार केला. तेच संविधान आज भाजप संपवायला निघाली



आहे, असा आरोपही उल्का महाजन यांनी केला. देशात वाढत असलेली महागाई, वाढती बेरोजगारी, उपासमार हीच का, मोदींची गॅरंटी, असा सवालही त्यांनी केला.

त्या म्हणाल्या आम्ही नेत्यांना स्पष्ट सांगतो की, निवडणुकीच्या राजकारणात मदत मागण्यासाठी येणाऱ्यांचे हात पसरलेले असतात. पण, आम्ही सर्व जनसंघटना असे म्हणतो, की आमचा हात पसरलेला नाही. आम्ही यांना काही हातभार लावयला आलेलो आहोत. योगदान द्यायला आलो असून, याबद्दल आमची कोणतीही अपेक्षा नाही. हे कार्य निर्विवादपणे आम्ही आमच्या खांद्यावर घेऊन चाललेलो आहोत.



इंडिया आघाडीच्या उमेदवारांचं निर्विवाद समर्थन आणि भाजपच्या उमेदवाराचा पाडाव, यासाठी महाराष्ट्रातल्या जनसंघटना कामाला लागल्या आहेत. भाजपकडून फुकट रेवडी वाटपाचे जे धोरण सुरू आहे, त्याची पोलखोल करण्याची गरज आहे. ८० कोटी लोकांना मोफत रेशन वाटपाचा दावा मोदी करत असून, तो आकडा आला कुठून, असा प्रश्नही महाजन यांनी केला.

भाजपकडून निवडणुकीत आमिष दाखविण्याचं काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणजे, रेशन दुकानांवर मोफत साडी वाटप सुरू आहे. आम्ही रायगड आणि पालघर जिल्ह्यात आदिवासी आणि मच्छिमार महिलांचे मेळावे घेतले, सावित्रीबाईंचा स्मृतिदिन साजरा केला, त्यात आम्ही आवाहन केले, की जे सरकार मणिपूरमधल्या आपल्या आदिवासी भगिनींची विटंबणा रोखू शकत नाही, त्यांच्यावरचे बलात्कार रोखू शकत नाही, त्यांना संरक्षण देऊ शकत नाही, त्या सरकारकडून आपण फुकट साडी घेणार का, त्यावेळी या महिलांनी एकच आवाज दिला, की आम्ही या सरकारच्या फुकटच्या साड्या घेणार नाही. शेतकरी, मच्छिमार विशेषतः आदिवासी महिलांनी मोर्चाने जाऊन त्या साड्या परत केल्या, हा आहे स्वाभिमान, असेही त्या म्हणाल्या. सरकारच्या कोणत्याही आमिषाला न भुलणारे शेतकरी बांधव, मच्छिमार महिला, शहीनबागमध्ये पहिल्या आवाज उठविणाऱ्या मुस्लीम भगिनी, आदिवासी महिला या सर्वांच्या पाठीचे कणे ताठ आहेत. त्यांच्यावर ईडीची तलवार टांगा, सीबीआय, इन्कमटॅक्सवाले मागे लावा किंवा एटीएसवाले मागे लावा, काहीही लावलं तरी, पाठीचे कणे झुकणार नाहीत. आणि, हाच महाराष्ट्राचा पाया आहे. तेव्हा या महाराष्ट्राच्या पायावर आपण एल्गार केला पाहिजे की, आता उषःकाल होता होता काळ रात्री झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली. आणि तीच मशाल शिवसेनेला मिळाली आहे. ती मशाल घेऊन अनंत गीते काळ रात्र मिटवायला निघाले आहेत. इंडिया आघाडीचे सर्व नेते बरोबर आहेत. एका बाजूला हात आहे आणि त्याच हातात तुतारी आहे, मशाल आहे. मशाल, तुतारी घेऊन काळ रात्र संपवायला निघालेल्या इंडिया आघाडीला मतदारांनी समर्थन द्यावे, अनंत गीतेंना पाठिंबा देत मनापासून शुभेच्छा देऊया की विजय तुमचाच आहे. आम्ही सगळे तुमच्याबरोबर आहोत, असेही त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

# तटकरे, आपल्याला अजून काय देणे बाकी होते

## जितेंद्र आव्हाडांचा सवाल

स्वतः पालकमंत्री, प्रदेशाध्यक्ष, मंत्री, मुलीला मंत्रीपद, मुलाला, भावाला, पुतण्याला आमदार केले. एकाच घरात पाच-पाच पदं दिली, अजून काय द्यायचे बाकी होते, असा सवाल करीत पवार घराणे तोडण्याचे पाप कोणी केले असेल, तर ते सुनील तटकरेंनी केले, अशी घणाघाती टीका राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तटकरेंचे नाव घेऊन केली. आधी अंतुलेंना फसवलं, त्यांच्याच पुतण्याला पक्षात घेऊन खांद्यावर हात टाकून फिरत आहात. अंतुलेसाहेब वरुन पाहात असतील, तर ते तुम्हाला कधीच माफ करणार नाही. ही फसवाफसवी आता चालणार नाही. रायगडची जनता सुज्ञ असून, आता तुमच्या कोणत्याही आमिषाला भीक घालणार नाही, असा घणाघात त्यांनी तटकरेंवर केला.



तटकरे साहेब एवढचं सांगा की, आपल्याला अजून काय द्यायचे बाकी होते? आ. जयंत पाटील तटकरेंना चांगले ओळखत असल्याने कायम सांगायचे, यांना मंत्री करु नका, तरी त्यांचा विरोध डावलून पवार साहेबांनी तुम्हाला सर्वकाही दिले. त्यांचेच घर फोडण्याचे काम आपण केलेत. त्यामुळे जयंत पाटील तटकरेंविषयी असे का सांगत असतील, याबाबत आता पटत असल्याचे आव्हाड म्हणाले. तटकरे हे पवार साहेबांचे इतके जवळचे होते की, त्यांच्या घरात सकाळी सात वाजता जाण्याचा अधिकार त्यांना होता. परंतु, २०१४ पासून ते आता २०२४ पर्यंत पवारांच्या जवळ सकाळी जायचे, आणि फक्त एवढंचे बोलायचे, साहेब आपण भाजपात जाऊया. आणि बाहेर येऊन सांगायचे साहेब तर हो बोलले होते. पण, तुम्हाला सांगतो, साहेब हो कधीच म्हणाले नव्हते. स्वतःचे भ्रष्टाचार लपविण्यासाठी यांना भाजपात जायचे होते, असा आरोपही आव्हाडांनी केला. साहेब कधीच जातीयवादी लोकांसोबत हातमिळवणी करणार नाहीत, हे संपूर्ण देशाला माहीत आहे. आपलं घर तुटताना दिसत होते; परंतु, साहेब कधी बोलले नाहीत, की घर न तुटण्यासाठी भाजपमध्ये जाऊया. घर तुटले तरी चालेल, पण महाराष्ट्राच्या मातीची साथ सोडणार नाही, गद्दारी करणार नाही, असेही ते म्हणाले.

# गीतेंना प्रचंड मतांनी विजयी करा : अनिल नवगणे

आपल्याला देश वाचवायचा असेल, देशातील लोकांचे भविष्य घडवायचे असेल, तर इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या मशाल चिन्हासमोर ७ मे रोजी बटण दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन शिवसेना दक्षिण रायगडचे अध्यक्ष अनिल नवगणे यांनी केले. देशात लोकशाही संपवून हुकूमशाहीच्या दिशेन वाटचाल सुरू आहे, अशी टीकाही त्यांनी केली. संविधान संपवायला निघालेल्या भाजपच्या विरोधात जनतेमध्ये प्रचंड नाराजी असून, त्यांनी आता ही निवडणूक हातात घेतली आहे. प्रत्येकाच्या मनात अनंत गीते यांचेच नाव आहे. देशाच्या भवितव्यासाठी मोदी परत येऊ नये, ही जनतेची भावना आहे. मोदी परत आले तर संविधान बदलण्याचे काम करतील, त्यांना भाजप एकच पक्ष ठेवायचा आहे. असे झाले तर देशात लोकशाही राहणार नाही. त्यामुळे हे चित्र बदलायचे असून, त्यासाठी आपल्याला या देशाचा पंतप्रधान राहुल गांधी करावे लागेल. त्यासाठी सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.



# शेतकरी नष्ट करण्याचा भाजपचा घाट

## विलास सुर्वे यांचा आरोप

आगामी लोकसभा निवडणूक ही खऱ्या अर्थाने ऐतिहासिक असणार आहे. ही निवडणूक स्वाभिमानाची आहे. २०१४ पासून भाजपचे सरकार आले. दहा वर्षांत या सरकारने जाती-जातीत वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात वाद निर्माण केला जात आहे. अघोषित हुकूमशाही लादली जात आहे. लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधात बोलणाऱ्याच्या विरोधात ईडीसह अनेक सुरक्षा यंत्रणेचा वापर केला जात आहे. शेतकऱ्यांना नेस्तनाबूत करण्याचा घाट घातला जात आहे. मात्र, काँग्रेसच्या काळात शैक्षणिक, आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध केल्या होत्या. काँग्रेस सरकारच्या काळात रोजगाराचे साधन खुले केले आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे विलास सुर्वे यांनी केले आहे.




# देशासाठी मुस्लिम बांधवांचे योगदान मोठे : पालकर

आजच्या राजकारणात मुस्लिम बांधवांप्रती क्लेष निर्माण केला जात आहे. त्यामुळे मुस्लिम बांधवांना अपशब्द वापरा, तरच राजकारणात टिकू शकता, असे राहूल गांधी यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी ते अमान्य केले. कारण देशासाठी मुस्लिम बांधवांचे योगदान खूप मोठे असल्याचे सांगितले. त्यांचे विचार हे सर्वधर्म समावेशक आहेत, त्यामुळे आम्ही इंडिया आघाडीसोबत असून आगामी निवडणूकीत अनंत गीते यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन मराठी मुस्लिम सेवा संघाचे अध्यक्ष इम्तियाज पालकर यांनी केले.



# मोदी साहेबांची गॅरंटी कुठे गेली? : सुभाष देसाई

आज कोट्यवधी तरुण बेरोजगार आहेत. शेतकरी कर्जबाजारी आहे. महागाई वाढत आहे, संविधान धोक्यात आहे. मग असे असताना मोदी साहेबांची गॅरंटी गेली कुठे, असा संतप्त सवाल सुभाष देसाई यांनी उपस्थित केला. सध्या भाजपाची कोणतीही गॅरंटी नाही. देशाची कोणतही गॅरंटी नाही. गॅरंटी आहे ती फक्त मोदी साहेबांची, असा खोचक टोलाही त्यांनी लगावला. आगामी निवडणुकीत गद्दारांना जागा दाखवून, सर्व मतभेद विसरुन इंडिया आघाडीचे उमेदवार अनंती गीतेंना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.



(पान १ वरुन)

# मोदींच्या हुकूमशाहीला गाडून टाका

इंडिया आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी मोर्बे येथे मंगळवारी (दि. २३) भव्य सभा पार पडली. त्याप्रसंगी शरद पवार बोलत होते. या सभेला रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. विशेष म्हणजे, मुस्लिम समाजातील महिला-पुरुषांचा उल्लेखनीय सहभाग होता.

यावेळी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, माजी मंत्री सुभाष देसाई, आ. जितेंद्र आव्हाड, आ. भास्कर जाधव, माजी आ. अनिल तटकरे, माजी आमदार पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, अस्लम राऊत, महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, मराठी मुस्लिम सेवा संघाचे अध्यक्ष इम्तियाज पालकर, शेकाप माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे, इम्तियाज वणू, संजय कदम, तानाजी जगताप, विलास सुर्वे शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) अशा विविध पक्षातील नेतेमंडळी तसेच इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.लोकशाही जेव्हा संकटात आली, तेथे हुकूमशाही अस्तित्वात आली आहे. आपल्या शेजारी बहुतांश राष्ट्रांमध्ये हुकूमशाही राजवट आल्याने ते देश रसातळाला गेले आहेत. मात्र, भारत देशाच्या संविधानाने हुकूमशाही राजवट येण्यापासून रोखले आहे. परंतु, मोंदींना रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्यासारखी राजवट आणायची आहे. त्यांना वेळीच रोखले नाही, तर आपला देश योग्य दिशेला जाणार नाही. याबाबत देशासह परदेशातील नेत्यांना आणि तेथील जनतेला याची भीती वाटत आहे. परंतु, आपण एकसंघ राहून अशा शक्तींना रोखले पाहिजे, असे आवाहन पवार यांनी केले.

भाजपाने विविध सरकारी तपास यंत्रणाच्या दहशतीने सरकारे पाडली आहेत. झारखंड, दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात डांबून ठेवले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शिक्षण, पाणी, आरोग्य, वीज वितरण, परिवहन या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केले आहे. केजरीवाल मोंदीच्या विरोधात बोलत असल्याने त्यांना तुरुंगात टाकल्याचे पवार यांनी सांगितले.

देशभरात आत सार्वजनिक चिंता व्यक्त केली जात आहे. मोंदींचा आणि भाजपाचा लोकशाही व्यवस्थेवर अजिबात विश्वास नाही. आपले संविधान आज संकटात सापडले आहे. घटना बदलली तर, सर्वांचेच अधिकार उध्दवस्थ होऊन देश संकटाच सापडेल, असा इशारा पवार यांनी दिला.

भाजपाने आतापर्यंत धर्म आणि जातीय तेढ निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यामुळे पुन्हा ते सत्तेत आल्यास देशाच्या हिताचे नाही, असेही त्यांनी सांगितले.

आजवर जेवढे प्रधानमंत्री होऊन गेले त्यांनी कधीच सूडाचे राजकारण केले नाही, त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीची सर मोदींमध्ये नाही. संसदीय कार्यपध्दतीमध्ये देशातील जनतेला एकसंघ ठेवण्याची मोदींमध्ये धमक नाही. त्यामुळे पुन्हा देशाची सूत्रं त्यांच्या हातात देणे घातक ठरेल, असे पवार यांनी स्पष्ट केले.

अटल बिहारी वाजपेयी हे नेहमी विरोधी पक्षाच्या नेत्यांना विश्वासात घेत असत. आता मात्र तशी पद्धत राहिली नसल्याकडे पवार यांनी लक्ष वेधले. देशाचा निकाल इंडिया आघाडीच्या बाजूने द्यायचा असेल, तर अधिक संख्येने मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

देशातील जनतेचा आता मूड बदलेला आहे. जनता मोदी सरकारच्या धोरणांना उबली आहे. त्यामुळे सत्तापरिवर्तन काळाची गरज आहे. अनंत गीते यांच्या रुपाने स्वच्छ चारित्र्याचा, विनम्र, सेवाभावी असणार उमेदवार इंडिया आघाडीने दिला आहे. मतदानाच्या दिवशी मशाल चिन्हासमोरील बटण दाबून भरघोस मतांनी गीतेंना विजयी करा, असे आवाहन पवार यांनी केले.

## जनताच तटकरेंना रायगडातून तडिपार करणार : अनंत गीते

आणि ही गरज ओळखून देशातील विविध राजकीय पक्ष केवळ राष्ट्रहिताकरिता, लोकशाही वाचविण्याकरिता, संविधान वाचविण्याकरिता सगळे मतभेद विसरुन एकत्र आले आहेत. इंडिया आघाडी म्हणून अतिशय उत्तम असे मनोमीलन या रायगड मतदारसंघात झाले असून, सर्व कार्यकर्ते एकदिलाने



काम करीत असल्याचे गीते म्हणाले. काल आंबेतच्या बैठकीसाठी गेलो असता तेथील जनतेने सांगितले की, या आंबेतच्या खाडीमध्ये त्यांचे आम्हाला विसर्जन करायचे आहे. त्यांच्या फसवाफसवीच्या राजकारणाला सर्व कंटाळले असून, कोणी मित्र शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे सगळेच अनंत गीतेंचे मित्र झाल्याचेही ते म्हणाले. आता सगळे राग काढणार असून, त्यांना त्याची कल्पना आहे. मोर्ब्याच्या इतिहासातील सर्वात विक्रमी सभा असल्याचेही ते म्हणाले. गावोगावी होणाऱ्या प्रचारसभांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळत असून, येथील जनता, मतदार तटकरेंविरोधात संताप व्यक्त करीत आहेत. तसेच वातावरण देशभरात आहे. त्यामुळे मोदींच्या विरोधात या देशात त्सुनामी आल्याशिवाय राहणार नाही, असेही गीते म्हणाले. ही लढाई तत्त्वांची असून, या महाराष्ट्रात झालेले गलिच्छ, नीच राजकारण तमाम जनतेला रुचलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्राची जनता राग काढणार असल्याचे गीतेंनी सांगत आपल्या विजयाचा रायगडच्या जनतेने निर्धार केला असून, सर्वांच्या पुण्याईने ही लोकसभा किमान दोन लाखांच्या फरकाने जिंकणार, असा विश्वास शेवटी अनंत गीते यांनी व्यक्त केला.

## तटकरेंचा पराभव करण्याची ताकद मुस्लिमांमध्येच

सुनील तटकरे, अजित पवार यांना शरद पवार यांनीच मोठे केले आहे. त्यांनीच आता गद्दारी केली आहे. तटकरेंनी जिल्ह्यातील नव्हे, तर राज्यातील बहुतांश जणांना फसवले आहे. मात्र, या निवडणुकीत त्यांना गाडल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी केला असल्याचे आमदार पाटील म्हणाले.

तटकरेंना पैसा आणि सत्तेची मस्ती आली आहे. त्यांची मस्ती मतदार उतरवल्याशिवाय राहणार नाहीत. तटकरेंना मोठे करण्याचे पाप जसे पवारांचे आहे, तसेच त्यांचे मोठे बंधू अनिल तटकरेंचे आहे. त्याच भावाला सुनील तटकरे यांनी फसवले आहे. आता बदला घेण्याची वेळ आली आहे, असे आमदार पाटील म्हणाले. आपली सत्ता आल्यावर ते तुमच्या पायाशी येतील, त्यांना थारा देऊ नका, असे पाटील यांनी शरद पवार यांना सांगितले.

भूमिका आणि तत्त्व जपणारा माणूस म्हणजे शरद पवार आहेत. त्यांच्याइतके काम आम्ही करु शकत नाही. मात्र, त्यांच्याकडे बघून आमच्या दंडात बळ येते, असेही ते म्हणाले. तटकरेंसह भरत गोगावले यांनीदेखील गद्दारी केली आहे. जिल्ह्यात ज्यांनी-ज्यांनी गद्दारी केली त्यांना धडा शिकवायचा आहे. जेणे करुन पुन्हा कोणी गद्दारी करण्याची हिम्मत करणार नाही, असे आवाहन त्यांनी केले.

देशभरात भाजपाच्या मोंदींनी विश्वास गमावलेला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचाच बोलबाला असल्याने केंद्रात आपलीच सत्ता येणार असून, राहुल गांधी हेच प्रधानमंत्री होतील, असे भाकितही आमदार पाटील यांनी केले. देशाचे कृषीमंत्री म्हणून शरद पवार यांनी केलेल्या कामाची सर कोणालाच येणार नाही. त्यांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे देश शेतीमध्ये आत्मनिर्भर झाल्याचे पाटील यांनी सांगितले.





# पदाची तरी लाज ठेवा

पहिल्या टप्प्यातील मतदानात भाजपला फटका बसेल अशी चर्चा सुरू आहे. विदर्भातील पाच जागांपैकी किमान तीनमध्ये भाजपला दणका बसेल असे अनेक जण म्हणत आहेत. राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाण इत्यादी राज्यांमध्ये, जिथे भाजपला गेल्या वेळी पैकीच्या पैकी जागा मिळाल्या होत्या, तिथे यंदा त्याला दणका बसेल अशा बातम्या आहेत. ते पाहून भाजपवाल्यांचा तोल सुटलेला दिसतो. सर्वात कहर नरेंद्र मोदी यांनी केलाय. राजस्थानमध्ये येथे त्यांनी अत्यंत आक्षेपार्ह विधान केले आहे. दुसऱ्या कोणी ते केले असते तर त्याच्याविरुध्द धार्मिक तेढ निर्माण केल्याचा खटला झाला असता. अटक झाली असती. निवडणूक लढवण्यावर बंदी आली असती. पण मोदींना आपल्या देशात सर्व माफ आहे. ते काय वाटेल ते बोलूनही सुटू शकतात. काँग्रेसने हिंदू लोकांची संपत्ती काढून ती मुस्लिमांना द्यायचे ठरवले आहे असा मोदींचा आरोप आहे. विशेष म्हणजे ते अत्यंत विखारी भाषेत याबद्दल बोलले आहेत. तुमची संपत्ती काढून घेऊन ती जास्त मुले असलेले लोक, घुसखोरांना दिली जाणार आहे असा दावा त्यांनी केला. हे शब्दप्रयोग मुस्लिमांबद्दल केले गेले आहेत. हे अत्यंत बेकायदा आहे. एका पंतप्रधानाने ते करणे हे तर लाजिरवाणे आहे. हा पंतप्रधान एरवी भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होणार असल्याच्या फुशारक्या मारत असतो. चंद्रावर भारत पोचला त्याचे श्रेय घेतो. पण तोच हा नेता आपल्या देशातील एका मोठ्या समुदायाबद्दल इतक्या विखारी द्वेषाने बोलू शकतो हे धक्कादायक आहे. काँग्रेसने त्यांच्या जाहीरनाम्यात ही संपत्ती काढून घेण्याची भाषा केली आहे हा मोदींचा दावा आहे. तो पूर्ण खोटा आहे. मुख्य म्हणजे आज इंटरनेटच्या जमान्यात कोणीही माणूस आपल्या मोबाईलवर हा जाहीरनामा स्वतःच उघडून वाचू शकतो. पण तरीही मोदी हे बोलत आहेत. कारण त्यांना समाजात हिंदू विरुध्द मुस्लिम असे विष पसरवायचे आहे.

### लाजिरवाणा नेता

काँग्रेसने जनगणना तसेच लोकांकडील संपत्तीची गणना करण्याची घोषणा केली आहे. पण एकाची संपत्ती काढून दुसऱ्याला देण्याचे कोठेही म्हटलेले नाही. गरीब, मागासवर्गीय, अल्पसंख्य इत्यादींना अधिक मदत करण्याचे आश्वासन त्यात आहे. पण मोदींनी जाणीवपूर्वक त्याचा चुकीचा अर्थ लावला आहे. तुमचे मंगळसूत्र देखील काँग्रेसवाले सोडणार नाहीत असा दावा त्यांनी राजस्थानात केला. काँग्रेसच काय, देशातील एमआयएमसकट कोणताही पक्ष सत्तेत आला तरी तो हिंदू स्त्रियांचे मंगळसूत्र किंवा दागिने काढून मुस्लिमांना देऊ शकणार नाही. अशी कोणतीही योजना आखली वा राबवली जाणे अशक्य आहे. तरीही मोदी हा खोटा प्रचार करीत आहेत. आता त्यांचे मूर्ख, आंधळे भक्त त्यांचीच री ओढताना दिसतील. असे केले तर हिंदू एक होतील व भाजपला मतदान करतील असा त्यांचा हिशेब आहे. दहा वर्षे केंद्रात सत्ता भोगल्यानंतर मोदी आणि मंडळींना मते मिळवण्यासाठी हे असले धंदे करावे लागावेत यातच त्यांची तथाकथित कर्तबगारी उघडी पडते. या देशातील संपत्तीवर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे असे मनमोहनसिंग म्हणाल्याचा खोटा दावा मोदींनी पूर्वीही केला आहे. काल तो पुन्हा केला. २००६ मध्ये सिंग यांनी केलेले हे भाषण आहे. त्यात त्यांनी असे काहीही म्हटलेले नाही. देशातील दलित, स्त्रिया, मुले, शेतकरी, अल्पसंख्य तसेच गरीब यांना मदत करण्यासाठी देशाची साधनसंपत्ती वापरली पाहिजे असे सिंग म्हणाले होते. त्यातील केवळ अल्पसंख्य हा शब्दप्रयोग उचलून तद्दन खोटा प्रचार भाजपवाले सातत्याने करत आले आहेत. मोदींनी तो करून आपल्या पदाची उरलीसुरली अब्रू धुळीत मिळवली आहे. इतका खोटारडा व विषारी भाषा बोलणारा पंतप्रधान गेल्या ७५ वर्षात या देशात झाला नाही. पुन्हाही कधी होऊ नये अशीच देशातील जनतेची इच्छा असेल.

### कोणत्या थराला जाणार?


यापूर्वी तेजस्वी यादव यांनी मासा खाण्याचा व्हिडिओ प्रसारित केल्यावर हा चैत्री नवरात्र पाळणाऱ्या हिंदूंना जाणीवपूर्वक चिथावण्याचा प्रयत्न होता असा जावईशोध मोदींनी लावला होता. त्यावर याच स्तंभामध्ये आम्ही लिहिले होते. मतदानाचा केवळ एकच टप्पा पार पडला आहे. तोवर मोदी इतके विष ओकू लागले आहेत. निवडणुका संपेपर्यंत ते कोणत्या थराला जातील हे सांगता येणे कठीण आहे. खरे तर निवडणूक आयोगाने मोदींच्या बोलण्याची स्वतःहून दखल घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करायला हवी. पण ज्यांच्या नेमणुका मोदींनीच केल्या आहेत ते आयोगाचे सदस्य त्यांच्याविरुध्द ब्र काढण्याची अपेक्षाच चुकीची आहे. कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसने काही आश्वासने दिली तर ती भरमसाठ आहेत व तिजोरीला पेलवणारी नाहीत असा दावा करून निवडणूक आयोगाने त्यांना आक्षेप घेतला होता. काँग्रेसच्या बाबतीत इतका सक्रिय असणाऱ्या आयोगाचे मोदी, शाह यांच्या बाबतीत हातपाय गारठतात हे नवल नाही. देशात लोकशाही केवळ नावालाच उरली असल्याच्या या खुणा आहेत. आज देशात बेकारी व महागाईचे प्रश्न गंभीर आहेत. मोदी ज्याला विकास म्हणतात त्याचा सामान्य लोकांना काहीच फायदा झालेला नाही. त्यामुळेच राममंदिर उभारले तरी त्याची लाट निर्माण होऊ शकलेली नाही. हे चित्र भाजपला कापरे भरवणारे आहे. या स्थितीवर मात करण्याचा त्याच्या लेखी एकच मार्ग आहे. हिंदू विरुध्द मुस्लिम अशी दुही समाजात निर्माण करणे. गेली दहा वर्षे मोदी स्वतःच सत्तेत असल्याने सध्या मुस्लिमांचे लांगूलचालन चालू आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे मग उद्या काँग्रेस पुन्हा सत्तेत आली तर ती मुस्लिमांनाच सर्व काही देईल असा प्रचार करावा लागत आहे. काँग्रेसचा जाहीरनामा मुस्लिम लीगसारखा व देशाचे तुकडे तुकडे करणारा असल्याची टीका करुन मोदींनीच या प्रचाराची सुरूवात केली होती. आपण पूर्ण देशाचे व सर्व समाजांचे पंतप्रधान आहोत हे भान मोदींनी केव्हाच गमावले आहे. ही अत्यंत दारुण स्थिती आहे.

विचार

# जाहीरनाम्यांचा लेखाजोखा

**भाजपा आणि काँग्रेस या देशातील दोन महत्त्वाच्या आणि ताकदवान राजकीय पक्षांनी आपापला जाहीरनामा मांडून सत्तेत आल्यास आपली दिशा काय असेल, हे स्पष्ट केले आहे. त्यामध्ये भाजपाने गेल्या दहा वर्षात राबवलेल्या योजनांचे आगामी स्वरुप स्पष्ट केले आहे तर दुसरीकडे काँग्रेसने रोजगार, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस देण्यात येणारी चालना, समलिंगींच्या विवाहाचा कायदा यासारखे मुद्दे हाताळले आहेत. याविषयी...**

**तन्मय कानिटकर**



भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या देशातील दोन मोठ्या आणि महत्त्वपूर्ण राजकीय पक्षांनी नुकतेच आपापले जाहीरनामे प्रसिद्ध केले. निवडणुकांच्या आधी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या जाहीरनाम्यांमधून त्यांची भविष्यातील उद्दिष्ट्ये, ध्येये आणि कार्यपथ स्पष्ट होत असतो वा मांडला जात असतो. त्यांच्या कार्याची दिशा कशी राहणार आणि समाजासाठी ते काय करणार, याची कल्पना यातून स्पष्ट होत असते. या दृष्टीने बघता भाजपाने २०१४ च्या जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांसाठी १०० टक्के नफ्याचे धोरण जाहीर केले होते. हीच स्वामिनाथन आयोगाची सूचनाही होती. मात्र २०१४ मधील ही बाब २०२४ च्या जाहीरनाम्यात नाही. केवळ किमान आधारभूत किंमत (एमएसपी) असा उल्लेख असला तरी ही किंमत नेमकी किती आणि कशी वाढवली जाईल, याबद्दल कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. त्यामुळे आपल्याच आधीच्या जाहीरनाम्यातील ही बाब यंदा हरवलेली दिसत आहे. दुसरीकडे, आत्ताच्या काँग्रेसच्या जाहीरनाम्यात स्वामिनाथन आयोगाच्या एमएसपीचा उल्लेख आहे, त्यांच्या शिफारसींचा उल्लेख आहे. मात्र सत्तेत असताना त्यांनीच या शिफारशी स्विकारल्या नव्हत्या आणि आता त्यांनी त्या संसदेत सांगितल्या. थोडक्यात, या पक्षाची याबाबत नेमकी स्पष्टता आढळून येत नाही. ते शेतकऱ्यांसाठी कशा पद्धतीने काम करणार हे जाहीरनाम्यातून स्पष्ट होत नाही. आकडेवारी बघितली तर, २०१३-१४ मधील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि २०२३ मधील आकड्यामध्ये फारसा फरक दिसत नाही. गेल्या वर्षभरात ११,५०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळेच आकडेवारीनुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये फारसा फरक झाल्याचे दिसत नाही. त्यामुळेच या मुद्द्यावर अधिक तपशीलवार माहिती येणे अपेक्षित होते. मात्र ते आलेले नाही.

भाजपाच्या जाहीरनाम्यात कायमच समान नागरी कायद्याचा उल्लेख आढळून आला आहे. तसा तो या वेळीही आहे. मात्र त्यात तपशील आलेला नाही. सध्या तरी या कायद्याचा एकच ड्राफ्ट उत्तराखंडमध्ये समोर आला असून अनेक आक्षेपही समोर आले आहेत. जाहीरनाम्यात ते सुधारण्याचा प्रयत्न दिसलेला नाही. खेरीज या कायद्यामुळे हिंदू कायद्यात होणारे आणि हिंदूंवर परिणाम करणारे बदल याविषयीही भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. उदाहरणार्थ, हिंदूंना मिळणारा अविभक्त कुटुंबाचा फायदा काढून टाकणार का, काढून टाकणार नसल्यास तो समान नागरी कायदा कसा राहणार असे काही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. मात्र त्याविषयी काहीही स्पष्टता बघायला मिळालेली नाही.

काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात 'समान नागरी कायदा' असे म्हटले नसले तरी पर्सनल लॉ (वैयक्तिक कायदा) मध्ये आवश्यक ते बदल केले जातील, असे म्हटले आहे. पण त्याचेही तपशील दिले न गेल्याने ढोबळ वाक्यापलिकडे फारसे आकलन होत नाही. याचा विचार करुन, तज्ज्ञांची मते घेऊन आम्ही याविषयी कृती करु, एवढे म्हणणे पुरेसे वाटत नाही. कारण काही वैयक्तिक कायदे राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात जाणारे आहेत. त्यामुळे ते बदलणे गरजेचे आहे. हे काँग्रेसनेही ठामपणे म्हणणे गरजेचे होते. मात्र त्यांच्या जाहीरनाम्यात हेदेखील दिसत नाही.

हे दोन्ही पक्ष जाहीरनाम्यांद्वारे इलेक्टोरल बाँड्सबद्दल काहीही बोललेले नाहीत. इलेक्टोरल बाँड्सची खूप मोठी स्कीम आली. पण अलिकडेच ती असंवैधानिक ठरली. अर्थात या स्कीमचा सर्वाधिक फायदा भाजपाला झाला. जवळपास ५० टक्के फंड्स त्यांना मिळाले तर काँग्रेसने कितीही विरोध केला असला तरी त्यांनाही याद्वारे तेराशे कोटी रुपये मिळाले. मात्र पॉलिटिकल फंडिंग आणि त्यातील पारदर्शकता याबाबत हे दोन्ही पक्ष आपल्या जाहीरनाम्यांमध्ये काहीही बोलत नाहीत. त्यामुळे हा विषयही विचारात घ्यायला हवा, कारण हे फंडिंग राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) हादेखील एक महत्त्वाचा मुद्दा असून भाजपाने त्यांच्या जाहीरनाम्यात याविषयी सांगितले आहे. काँग्रेसने या कायद्याला विरोध केला आहे. मात्र आश्चर्यकारकरित्या त्यांच्या जाहीरनाम्यामध्ये यावर कोणतेही भाष्य दिसत नाही. जाहीर भाषण वा पत्रकार परिषदांमध्ये याविषयी केलेला विरोध जाहीरनाम्यामध्ये मात्र दिसून येत नाही. त्यामुळे सत्तेत आल्यास ते हा कायदा बदलतील की नाही, याविषयी घेतलेली संदिग्ध भूमिकाच समोर येते.

न्यायालयाने समलिंगी विवाहाबद्दल मत मांडताना हे संसदेचे काम असून त्यांनीच अशा लग्नांना संमती द्यावी, असे सांगितले होते. मात्र त्या कायद्याबद्दल भाजपाच्या जाहीरनाम्यात काहीही दिसत नाही. अर्थात भाजपाने समलिंगी विवाहाला विरोधच केला आहे. मात्र त्यांना वा या गटातील अल्पसंख्याकांना काही सुविधा दिल्या जातील का, त्यांच्याविषयी काय वेगळे केले जाईल याचा उल्लेख काँग्रेसच्या जाहीरनाम्यात आहे. ही चांगली बाब म्हणावी लागेल. याखेरीज महानगरपालिकांचा कायदा किंवा त्याबाबत लोकांना जास्त अधिकार देणारा कायदा खरे तर यायला हवा. याबद्दल फारसे कोणी बोलत नसले तरी याची गरज आहे. आता ग्रामीण भागात ग्रामसभेचा कायदा आहे. त्यामुळे तिथे लोक स्थानिक बाबतीत थेट निर्णय घेतात. मात्र तसा वॉर्डसभेचा कायदा शहरी भागातील नागरिकांसाठी नाही. त्यामुळे शहरी भागातील लोकांना असा अधिकारच मिळत नाही. हे लक्षात घेता हा कायदा आणि घटना दुरुस्ती यायला हवी. ७३ वी घटनादुरुस्ती ग्रामीण भागासाठी आली. तशी ही दुरुस्ती आणण्याविषयी दोन्ही पक्षांच्या जाहीरनाम्यात कोणताही उल्लेख आढळत नाही. खेरीज शहरी भागातील शासन सुधारण्यासाठी शहराची महापालिका यंत्रणा बदलण्याचा प्रस्ताव काँग्रेसच्या जाहीरनाम्यात आहे. महापौर थेट निवडला जावा, महापौराला पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांसारखे थेट कार्यकारी अधिकार असावेत असे त्यांच्या जाहीरनाम्यात स्पष्ट म्हटले आहे. पूर्वी भाजपानेही अशी भूमिका घेतली होती. मात्र आपल्या जाहीरनाम्यात त्यांनी याचा उल्लेख केलेला नाही. शहरी शासन सक्षम करण्याबाबतचा उल्लेख वा त्याबद्दलची भूमिका त्यांनी स्पष्ट मांडलेली नाही.

जाहीरनाम्यात खासदारांविषयीच्या काही व्यक्तिगत गोष्टी असायला हव्यात. उदाहरणार्थ, संसदेतील त्यांची उपस्थिती, वेगवेगळे अहवाल मांडणे, समित्यांमध्ये चर्चा होणे याविषयी अनेक खासदार नागरिकांना माहिती देत नाहीत. किंबहुना, या वेळची लोकसभा खूपच कमी काळ चालली. अधिवेशनांचे दिवस बरेच कमी होते. त्यामुळे खासदार म्हणून समोर येणारी व्यक्ती चर्चेत कसा सहभाग घेईल, जनतेचे प्रश्न संसदेत कसे उपस्थित करेल आणि कसा पाठपुरावा केला जाईल, हे मुद्देही जाहीरनाम्यामध्ये स्पष्ट करायला हवेत. मात्र संसदीय कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने कोणतेही मुद्दे या दोन्ही मोठ्या राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात दिसत नाहीत.

सध्या बेरोजगारीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. मात्र भाजपाच्या जाहीरनाम्यात ती कमी करण्याविषयी काहीही आश्वासन देण्यात आलेले नाही. खरे तर या पक्षाने कौशल्यविकासावर बराच भर दिला होता. मात्र आधीच्या जाहीरनाम्यात होते तेवढ्या मोठ्या प्रमाणातील आश्वासन आता दिसत नाही. एका अहवालानुसार नुकतेच पदवी घेऊन बाहेर पडलेले निम्मे युवक-युवती आज कोणत्याही रोजगाराविना आहेत. यावर पक्षांची नेमकी काय भूमिका असेल, हेदेखील जाहीरनाम्यांमध्ये स्पष्ट केलेले नाही. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात जवळपास तीस लाख सरकारी नोकऱ्यांमधील पदे भरण्याचे जाहीरनाम्यात स्पष्ट केले आहे. पण इतक्या मोठ्या प्रमाणात पदे भरल्याने सरकारवर किती मोठा ताण येईल याचा विचार केलेला दिसत नाही. तीस लाख पगार तसेच इतर सुविधा देणे कोणत्याही सरकारसाठी खचितच खूप मोठी बाब आहे. म्हणूनच हे आश्वासन देताना तारतम्याने विचार केला आहे की नाही, अशी शंका येते. सरतेशेवटी सांगायचे तर, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होईल, हे बघावे लागेल. एमएसपी देऊ, मुबलक रोजगारसंधी देऊ असे म्हणणे ही एक बाब असते, पण त्यामुळे सरकारवर पडणारा बोजा वेगळा असतो. दुसरीकडे, भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात आहेत त्याच बाबी पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हे बघत असताना गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांची खरोखर अंमलबजावणी झाली आहे का आणि असेल तर किती झाली आहे, याचा विचार मतदारांनी करायला हवा. उदाहरणार्थ, 'आयुष्मान भारत'सारखी योजना कल्पनेत खूप चांगली आहे. मात्र प्रत्यक्षात यातील अनेक चुकीच्या बाबी कॅगच्या अहवालातून समोर आल्या. त्यामुळेच या सर्व आश्वासनांना न भूलता तारतम्याने निर्णय घेण्याची जबाबदारी आता मतदात्यांची आहे.

आजकाल

# पण पालघरला देऊ शकत नाही उमेदवार

**रमाकांत पाटील**

पालघर लोकसभा मतदारसंघासाठी शिवसेना शिंदे- भाजप महायुतीने आजवर आपला उमेदवार जाहीर केलेला नसल्याने महायुतीत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.एका बाजूने भाजपा तर दुसऱ्या बाजूने शिवसेना शिंदे गट स्वतंत्रपणे तसेच एकत्रितपणे कार्यकर्ता मेळावे घेत असले तरी आता आम्हा कार्यकर्त्यांच्या संयमाचा अंत पाहू नका, असेच ते म्हणत असतील. पालघर लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारीचा हा घोळ केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसाठी प्रतिष्ठेचा बनलेल्या ठाणे मतदारसंघामुळे सुरू आहे, हे एव्हाना सर्वांच्या लक्षात आले आहे.ठाणे मतदारसंघ कोणाकडे जाणार, हे शिंदेंनाही एव्हाना ठाऊक असणार. परंतू सेनेच्या कार्यकर्त्यांसाठी भाजपशी अखेरपर्यंत प्रयत्न केले, हे दाखविण्यासाठी त्यांच्याकडून हा निर्णय लांबणीवर टाकला जात असावा, अशी चर्चा आहे.

राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडल्यानंतर मूळ शिवसेनेतून निवडून आलेले खासदार राजेंद्र गावित सुरुवातीला मूळ शिवसेनेतच राहिले. मात्र काही काळानंतर त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. हे नवीन सरकार बनत असताना, भाजपने शिंदे गटाला विद्यमान खासदार-आमदारांना लोकसभा-विधानसभेत संधी दिली जाईल असे आश्वासन दिल्याचे बोलले जाते. त्याच सुत्रानुसार गावित यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर गावित यांनाही शिंदे यांनी आश्वासन दिले असेल, किंबहुना असे आश्वासन मिळाल्यानंतरच गावित यांनी शिंदे गटात प्रवेश केला असावा.शिंदे यांनी आपल्या पक्षात आलेल्या सर्व खासदारांना लोकसभा निवडणुकीत संधी दिली जाईल असे वारंवार सांगितले आहे. मात्र लोकसभा निवडणूक घोषित झाल्यानंतर

शिंदेचा वादा खोटा ठरला आहे. किंबहुना भाजपकडून एकनाथ शिंदे यांची जागोजागी कोंडी केली जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामुळे गावितांची अस्वस्थता दिवसेंदिवस वाढतच आहे.

राज्यातील कोणत्याही मतदारसंघापेक्षा शिंदे यांना कल्याण मतदारसंघ टिकवून ठेवण्यात रस होता,हे लपून राहू शकले नाही. अर्थात हा मतदारसंघ देतानाही फडणवीस यांनी त्यासंदर्भातील घोषणा करून शिंदेंवर एकप्रकारे कुरघोडीच केल्याचे मानले जाते. कल्याणच्या घोषणेनंतर ठाणे, पालघर, नाशिक मतदारसंघासंबंधीचा घोळ संपेल अशी अपेक्षा होती, मात्र ही अपेक्षाही फोल ठरली आहे. नाशिक मतदारसंघातून छगन भुजबळ यांनी माघार घेतल्यानंतर आता शिंदे गटातून उमेदवार कोण असणार, याचाही निर्णय होऊ शकलेला नाही. पालघर मतदारसंघाच्या उमेदवाराची घोषणा ठाणे मतदारसंघाच्या तिढ्यामुळे होत नसावी. अर्थात कल्याण आणि नाशिकनंतर ठाणे मतदारसंघ भाजपकडे जाणार हे स्पष्टपणे दिसते. किंबहुना असा निर्णय झाल्याचेही सांगितले जात आहे. मात्र त्याचवेळी पालघर मतदारसंघही आपल्याचकडे ठेवण्याच्या प्रयत्नात भाजप असल्याचे समजते. यामुळे तर शिंदे गटात व त्यातही गावित व समर्थकांमध्ये नैराश्याची भावना असल्याचे जाणवते. देशातील १०२ मतदारसंघातील निवडणुकांचा पहिला टप्पा अलीकडेच पार पडला. ह्या टप्प्यात सरासरी ६ टक्के इतके मतदान कमी झाले. ह्या टप्प्यादरम्यान दिसून आलेले वातावरण भाजपला दिलासा देणारे नव्हते अशी चर्चा लगेचच सुरू झालेली आहे. महाराष्ट्रातही हिच परिस्थिती राहिल्याची चर्चा आहे. यामुळेच भाजप निर्णय घेण्यात घाई करत नसल्याचे समजते. पालघर मतदारसंघात बहुजन विकास आघाडीही स्वतंत्रपणे रिंगणात उतरणार आहे. ह्या मतदारसंघात ठाकरे यांना मिळत असलेला पाठिंबा व बविआचा स्वतंत्र उमेदवार यामुळे भाजपची चिंता वाढली असणार. अशा स्थितीत बविआने भाजपच्या चिन्हावर लढावे किवा भाजप-शिंदे सेनेने बविआला पाठिंबा द्यावा यासंबंधीची शक्यता महायुती अजमावून पाहत असणार अशीही एक चर्चा आहे.

नेते-कार्यकर्त्यांची ही दमछाक सुरू असतानाही स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांनी आपले काम सुरू ठेवले आहे. यातील भाजप कार्यकर्त्यांना वरीष्ठ पातळीवरून नेत्यांच्या भेटीच्या माध्यमातून बळ मिळत आहे. मात्र शिंदे गटातील वरिष्ठांनी जिल्ह्यातील आपल्या कार्यकर्त्यांना थेट वाऱ्यावरच सोडले आहे. कोणीही वरिष्ठ पदाधिकारी अलीकडील काळात पालघरपर्यंत पोचला नसल्याची शिंदे सेनेच्या नेते-कार्यकर्त्यांची तक्रार आहे. महिन्यापूर्वी अनेक नेत्यांनी ह्या भागात येऊन हवा भरली. खासदार गावित यांनाच उमेदवारी मिळणार म्हणून आश्वस्तही करण्यात आले. मात्र आता ह्या सर्वांना पालघरचा विसर पडला की काय अशी कुजबुज येथे सुरू आहे. कल्याण-ठाणे महत्वाचे असेल, पण पालघरकडे दुर्लक्ष व्हावे इतके महत्वही ह्या भागांना असू नये, ही येथिल नेते-कार्यकर्त्यांची रास्त अपेक्षा आहे. अबकी बार ४०० पार म्हणणाऱ्या महायुतीची उमेदवार ठरविताना होणारी ही दमछाक आणि परस्परावरील कुरघोडीचे राजकारण अनेक अर्थांने बोलके आहे, असेच सद्यस्थितीबद्दल म्हणता येईल. आता कोणत्याही क्षणी उमेदवारासंबंधीचा निर्णय होणार असताना, गावितांना पुन्हा संधी मिळणार का, याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिलेले आहे. त्याचबरोबरीने बविआ आमदार राजेश पाटील यांना संधी देणार की संतोष बुकले यांची वर्णी लागणार याकडेही बविआसह सर्वांचे लक्ष राहणार आहे.

लोकसंसद

### देवेंद्रा अजब तुझे सरकार

महाराष्ट्राच्या राजकारणात विरोधी पक्षनेता, मा. मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री, आणि भाजपचे नेते म्हणून कार्यक्रम असे देवेंद्र फडणवीस यांचे मात्र सध्या गृहखात्याच्या प्रशासनावर व पोलीस दलावर लक्ष नसून शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्ष फोडीच्या राजकारणात विशेष लक्ष देऊन त्यांच्या मागे लागले आहेत. याबाबत पूर्वी सत्तेत असताना त्यांनी निवडणुकीनंतर मी पुन्हा येईनचा नारा दिला होता. पण तो यशस्वी न झाल्यामुळे आता मी दोन पक्षांना फोडून पुन्हा सत्तेच्या राजगादीवर येऊन बसलो असे जाहीरपणे सांगतात पण, त्यांच्या या काळात त्याच्याकडे गृहखाते असताना मुंबई, पुणे, नागपूरसह इतरही शहरातील भागात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. राज्यात लहान मुले, तरूण मुली व स्त्रियांवर होणारे अत्याचार तसेच त्यांचे हजारोंच्या संख्येने बेपत्ता होणे देखील एक चिंतेची बाब ठरली आहे. त्याशिवाय खून, दरोडे, दंगली यांचे वाढते प्रमाण तर, शेतकरी व मराठी आंदोलनातील तरूणांचे होणारे आत्महत्या सत्र तसेच कोटी-कोटीचा होणारा भ्रष्टाचार हे सर्व चित्र अत्यंत निराशादायक असे वातावरण असल्याचे उघड्या डोळ्यांनी पाहत असताना महाराष्ट्राच्या सत्तेचा रिमोट त्यांच्या हातात आहे अशा या महासत्ताधीशांना एवढेच म्हणावेसे वाटते की 'देवेंद्रा' अजब तुझे सरकार

**- राजेंद्र लकेश्री,** मुंबई

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**चोवीस एप्रिल**


**१८९६:-** पेशाने वकील असूनही मराठीतील पहिले 'शेतकरी कादंबरीकार' ठरलेले रघुनाथ वामन दिघे यांचा जन्म. 'पाणकळा', 'रे पाण्या', 'आई आहे शेतात; 'कार्तिकी' या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या. ग्रामीण जीवनाचे जवळून निरीक्षण, हा त्यांच्या लेखनाचा प्राण होता. १९८० साली त्यांचे निधन झाले. **१९०४:-** 'भावशर्मा' या टोपणनावाने लेखन करणारे कवी, कथाकार, नाटककार, समीक्षक, संपादक के. नारायण काळे तथा केशव नारायण काळे यांचा जन्म. 'सहकार मंजिरी' हा काव्यसंग्रह. कॉटिल्य, मराठी नाटक व मराठी रंगभूमी या पुस्तकांसह 'प्रतिमा रुप आणि रंग' हा त्यांचा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ तसेच रत्नाकर, प्रतिमा, महाराष्ट्र 'साहित्य पत्रिका' या नियतकालिकांचे संपादन त्यांनी केले. **१९२३:-** लेखक, कृषी अर्थतज्ज्ञ प्रा. श्यामकांत महादेव पाटील यांचा जन्म. 'कृषी उत्पादन अर्थशास्त्र' आणि 'भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था' ही पाठ्यपुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२३:-** लेखक प्रा. मधुकर नारायण लोही यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'निवडक व्यक्तिरेखा', 'साहित्य आणि कला', 'शरदचंद्र-एक अभ्यास', 'कृषीकेंद्रित वैदिक धर्म आणि संस्कृती', 'मराठी नाटक आणि रंगभूमी' या पुस्तकांशिवाय 'पं. मदनमोहन मालवीय, डॉ.पंजाबराव देशमुख, डॉ.अब्दुल कलाम, डॉ.पा.सं. खानखोजे आदींची चरित्रे तसेच वृत्तपत्रातून २०० हून अधिक लेख प्रसिध्द झाले आहेत. याशिवाय 'निबंध संचय', 'निवडक व्यक्तिरेखा', 'मराठी नाटक व रंगभूमी' 'लाटांचा आवाज', 'हिंदूधर्म आणि संस्कृती' इत्यादी ग्रंथसंपदा. **१९२४:-** 'आदर्श मराठी शब्दकोश'कर्ते प्रल्हाद नरहर जोशी यांचा जन्म. एक हजाराहून अधिक व्याख्याने आणि २५० हून अधिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यामध्ये 'अणुसूत्राचे निर्माते', असे शोध असे शोधक, 'विज्ञान उदय व विकास', 'विज्ञान कथा भाग १ ते ३' मिळून १५ विज्ञान विषयक तर 'गोंदवलेकर महाराज', 'मुन्शी प्रेमचंद्र', 'शरच्चंद्र चट्टोपाध्याय' मिळून वीस एक चरित्र ग्रंथ लेखन, 'आंधळी गौळण', 'मीरा बावरी', 'पांचाली' मिळून दहा एक कादंबऱ्या, १८ पुराणांसह, १० उपपुराणे याशिवाय त्यांच्या संकीर्ण साहित्यात 'अनंत आमुची साहसप्रीती भाग १,२', 'नवलनगरी भाग १,२', 'भौगोलिक साहसकथा भाग १,२' मिळून १५ एक ग्रंथ तसेच 'आज्ञापत्र', 'कथाकमल' मिळून दहा संपादित ग्रंथ आणि 'अलंकार व वृत्ते', 'सार्थ तुकाराम गाथा भाग १,२', 'मराठी वाङ्‌मयाचा विवेचक इतिहास', 'राजवाडे विचारदर्शन दिनविशेष' मिळून २५ एक संदर्भ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९२५:-** लेखिका इंदू जयंत टिळक यांचा जन्म. गोवा मुक्ती व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी. 'सह्याद्री' मासिकाचे संपादन करणाऱ्या इंदूताई 'केसरी'च्या संपादकीय विभागात कार्यरत होत्या. ह्यांच्या लेखन संपदेत 'ओरोगामी फोल्डर्स', 'गीता रहस्याची संक्षिप्त आवृत्ती', 'जपानी पुष्परचना आणि सुगरण चार भाग इ. **१९२८:-** एक लोकप्रिय प्रशासक, वक्ते, लेखक डॉ. मोरेश्वर उर्फ वसंतराव पटवर्धन यांचा जन्म. 'अर्थ व्यवस्थापन', 'अर्थानुभव', 'अर्थकथाकथन', 'ताळेबंद विवरण व अभ्यास' हे आर्थिक विषयांसंबंधीचे ग्रंथ तसेच 'आर्य' ही कादंबरी. 'क्रांतीचा खंजीर', 'तेरा नंबरची खुर्ची', 'लाल बाणाची खूण', 'लोकनटीचे दिल' ह्या रहस्य कादंबरीका. 'छुकछुक सैया', 'वसंत आला' हे कथासंग्रह शास्त्रीय आर्थिक विवेचनावर 'विदेश विनिमय' आणि 'सोन्याचं हरिण' आणि 'एस. एम. जोशी-व्यक्ती' 'वाणी व लेखणी' हा संपादित ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९२९:-** लेखक, पेशाने डॉक्टर बालकृष्ण शंकर जावडेकर यांचा जन्म. यांनी वैद्यकीय विषयांवर लेखन केले असून त्यामध्ये 'आजार, आचार, विचार भाग १,२ हे वैद्यकीय विषयांवरील लेख आणि 'कहाणी पुर्नजन्माची' ह्या पुस्तकातून प्राणघातक हृदयविकाराची शिकार होऊन पुर्नजन्म मिळालेल्या एका डॉक्टरचे आत्मकथन अशी साहित्य संपदा. **१९३०:-** रेखाचित्रकार आणि उपयोजित कलावंत बाळ ठाकूर (भालचंद्र शिवराम ठाकूर) यांचा जन्म. 'मौज' मधील चित्रे आजही त्यांची असतात. 'रवींद्रनाथ-तीन व्याख्याने', 'तीन पैशांचा तमाशा', 'साधा माणूस' आदी त्यांची मुखपृष्ठे चित्रांमधील, तर 'धर्म आणि लोकसाहित्य' सारखे मुखपृष्ठ अक्षररचनेतील त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. **१९३६:-** कथा-कादंबरी-नाटककार पद्माकर गोवईकर यांचा जन्म. 'गोफ', 'नायगारा', 'देवगांधार' असे कथासंग्रह तर 'सांगू नये ते', 'वंगण', 'वय वेड असतं' या कादंबऱ्या तसेच 'रातराणी', 'देह देवाचे मंदिर' ही नाटके अशी साहित्य संपदा. **१९४३:-** लेखक धोंडू पेडणेकर यांचा जन्म. ह्यांची 'रातांबे', 'जांभ्या खडकातील पाझर', 'सावल्यांच्या प्रतिमा', 'आभाळ पेलताना', 'बुडणारी तारवे', 'सूर आले जुळूनी' हे सहा कथासंग्रह, तसेच 'तरणा पाऊस', 'अस्वस्थ मनाचे आक्रंदन' हे दोन काव्यसंग्रह, 'बकुळ फुले', 'संस्कार दीप' ही दोन लहान मुलांसाठी पुस्तके याशिवाय संपादित चार पुस्तके. प्रासंगिक अंक + स्मरणिका सुमारे ६, सामना, नवशक्ती, बुलंद महाराष्ट्र टाईम्समध्ये अनेक लेख प्रकाशित. **१९६० :** ग्रंथकार, पत्रकार लक्ष्मण बळवंत भोपटकर उर्फ अण्णासाहेब यांचे निधन. त्यांच्या साहित्यसंपदेत माझी व्यायाम पद्धती, दांडपट्टा, स्त्रियांचे व्यायाम या पुस्तकांसह काँग्रेस व कायदेमंडळ, हिंदू समाजदर्शन, स्वराज्यांची मिमांसा अशी साहित्यसंपदा.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ एप्रिल
१) श्री. वसंत कानू सिंगासाने
अलिबाग, २४-४-१९३९
२) श्री. रमेश जगन्नाथ नागवेकर
पंतनगर अलिबाग, २४-४-१९३८
३)श्रीम.नीता शरद राउळगावकर
विद्यानगर, अलिबाग २४-४-१९४०
४)श्रीम.वसुधा अनंत कामतेकर
ब्राम्हणआळी, अलिबाग, २४-४-१९४३
५)श्री.सुहास, कमळाकात सबनीस
ठिकरूळ नाका, अलिबाग २४-४-१२९५४
६)श्री.के .एस.पुष्षगंधन
गोकुळेश्वर, गोंधळपाडा, २४-४-१९६१

# सलग पाच दिवस कोकण होरपळणार




**राज्यात सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात प्रचारयुद्ध भडकले आहे. वाढलेल्या उष्णतेमुळे उमेदवारांच्या प्रचारावर विपरीत परिणाम होत आहे. दुपारी उन्ह अधिक असल्याने विविध पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना सायंकाळी पाचनंतर प्रचाराला बाहेर पडावे लागत आहे.**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

राज्यात उष्णतेची प्रचंड लाट आली असून, हवामान विभागाकडून कोकणाला यलो अलर्ट देण्यात आला आहे. गेल्या काही दिवसात प्रत्येक जिल्ह्यात उष्णतेचा प्रकोप वाढताना दिसत आहे. त्यामध्ये कोकण अधिक होरपळून निघत आहे. २३ ते २७ एप्रिल अशा सलग पाच दिवस कोकणातील ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात तापमानात वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकणासाठी पुढील काही दिवस अतिशय महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे येथील नागरिकांनी वावरताना विशेष काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हा प्रशासनाने केल्या आहेत.

गेल्याकाही दिवसांमध्ये वातावरणामध्ये अचानक बदल झाला आहे. उष्णतेची तीव्रता एप्रिल महिन्यात अधिक असल्याचे जाणवत आहे. पुढील पाच दिवस अशीच परस्थिती राहणार आहे. त्यानंतर तापमान हळूहळू कमी होईल. तीव्रता जरी कमी झाली, तरी उष्णता राहणार आहे. त्यामुळे कोकणात ऑरेंजऐवजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात २३, २४ आणि २५ एप्रिल या कालावधीत वातावरण सामान्य राहणार असून, २६ आणि २७ एप्रिल रोजीसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. त्यामुळे येथील नागरिकांनीदेखील सर्तक राहणे गरजेचे आहे.

दुपारी १२ ते ४ वाजताच्या दरम्यान नागरिकांनी बाहेर पडू नये, पुरेसे पाणी घ्यावे, उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नागरिकांना केले आहे.

कोकणाबरोबरच मध्य महाराष्ट्रातील दक्षिण जिल्ह्यांमध्ये म्हणजेच सातारा, सांगली, कोल्हापूर तसेच विदर्भ, मराठवाडा ह्या सगळ्या भागांमध्ये उष्णतेची लाट असण्याची शक्यता आहे. वातावरणातील आदर्ता कमी झाल्यामुळे उष्णता वाढली आहे. गेल्या काही दिवसांपासून गुजरात आणि राजस्थानकडून उष्ण आणि कोरडे वारे वाहू लागले. त्यामुळे वातावरणातील आदर्ता वाढल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मातावाल पोषण आहार रखडला

## मातृवंदना योजनेचे अनुदान मिळण्याची 'नो गॅरंटी'; सरकारी अधिकारी गप्प

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील माताबाल पोषण आहार गेल्या चार महिन्यांपासून रखडला असून, लोकसभा निवडणुकीनंतरच पोषण आहाराचे वाटप होईल, अशी माहिती पोलादपूर शहरातील तसेच तालुक्यातील अंगणवाड्यांतून देण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या चार वर्षांपासून प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या लाभार्थ्यांची नावे ऑनलाईन अपलोड करण्यासाठी दोन वेबसाईटसच्या नादुरूस्तीची चर्चा झाली असून, देशभरात अशीच परिस्थिती असल्याचे सांगून संबंधित खात्यांच्या सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांपासून अनुदान मिळण्याची नो गॅरंटी असल्यासारखे मौन बाळगल्याचे दिसून येत आहे.

देशातील दारिद्र्यरेषेखालील व वरील महिलांना प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत राज्यात १ जानेवारी २०१७ पासून तीन टप्प्यात ५ हजार रूपये रकमेचा लाभ थेट बँक अथवा पोस्टाच्या खात्यात जमा केला जाण्याचा शासन निर्णय ७ डिसेंबर २०१७ पासून अंमलात येऊ लागला. राज्यात सरकारी रूग्णालयामध्ये गर्भवती महिलेने नोंद केल्यानंतर वेबपोर्टलवरून आशा सेविका अथवा फिड फंक्शनरी यांनी सदर महिलेची माहिती अपलोड करायची आहे, असे सांगण्यात आले. पोलादपूर शहरातील गर्भवती आणि प्रसूती झालेल्या महिलांसह तालुक्यातील अनेक गर्भवती आणि प्रसूती झालेल्या महिलांची माहिती या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात वेबपोर्टलवर अनेक अडचणी आल्याने दुसऱ्या वेबसाईटवरून माहिती अपलोड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. २०२० पासून आतापर्यंत अनेक महिलांना उडवाउडवीची, वेबपोर्टलमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाल्याने पुन्हा माहिती अपलोड करावी लागल्याची तसेच तुमचे बँक खाते तपासून बघा, अशी मोघम उत्तरे देण्यात आली आहेत. या कालावधीमध्ये लाभार्थी महिलांना आशा सेविका असलेल्या महिलांकडूनच अशी उत्तरे देण्यास भाग पाडणाऱ्या तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आजतागायत या प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा डाटा अपलोड होऊन लाभार्थी महिलांना देय रक्कम खात्यात जमा झाले आहे अथवा कसे याबाबत खातरजमा केलेली दिसून येत नाही. आरोग्य विभागाचे उपसचिव शिवराज धुळे यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी ०९१०२०२३ रोजी नवीन सुधारित दराचा जीआर काढून जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे निधी वर्ग करण्यात आला आहे असे सांगितले आहे, अशी माहिती दिली.

यासंदर्भात महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती विखे व डीआरसीएच डॉ. शिंदे यांच्यासोबत चर्चा केली असल्याचे सांगून दोन्ही अधिकाऱ्यांनी सर्व लाभार्थ्यांची यादी तयार आहे. परंतु १ एप्रिल २०२३ पासून पोर्टलमध्ये बदल झाल्या कारणाने रजिस्ट्रेशन करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. परिणामी, शासनाकडून सोमवारी ट्रेनिंग घेण्यात येऊन याबाबत शासनाबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्स सोमवारी करण्यात आली आहे. पोलादपूर शहर आणि तालुक्यातील माताबाल पोषण आहाराबाबत शहरातील पोषण आहार नगरविकास खात्यामार्फत आणि तालुक्यातील ग्रामीण भागातील माताबाल पोषण आहार पूर्वीप्रमाणेच महिला व बालकल्याण विभागाकडून मिळत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, चार महिन्यांचा एकत्रित पोषण आहार मिळेल असे सांगणाऱ्या या यंत्रणेला सध्या लोकसभा निवडणुकीनंतर माता-बाल पोषण आहार एकत्रितपणे मिळेल, असे सांगावे लागत असल्याने 'सरकारी काम सहा महिने थांब'चा अनुभव घेणाऱ्या माता-बालकांची भूक किती महिने आळविता येणार, याची शाश्वती दिसून येत नाही.

# मुदत संपली तरी रस्ते अपूर्णच!

## कोल्हारे ग्रा.पं.मधील तीन रस्त्यांच्या कामांबाबत ठेकेदार उदासीन



**। नेरळ। प्रतिनिधी ।**

नेरळ संकुल विकास प्राधिकरणकडून कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत तीन रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली होती. या रस्त्यांची कामे करण्यासाठी कामाचे कार्यादेश रायगड जिल्हा परिषदेकडून ऑगस्ट २०२३ मध्ये देण्यात आले होते. मात्र, मुदत संपली तरी ती सर्व कामे अर्धवट आहेत. दरम्यान, नेरळ संकुल विकास प्राधिकरणकडून संबंधित ठेकेदार यांना पत्र देऊन सूचित करण्यात आल्यानंतरदेखील ठेकेदार कोणत्याही प्रकारे कामे सुरू करून पूर्ण करीत नाही. त्यामुळे रस्त्याची कामे मिळविणाऱ्या ठेकेदारावर जिल्हा परिषदेने कारवाई करावी आणि नवीन ठेकेदाराला ती कामे देण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी केली आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतमध्ये नेरळ बोपेले रस्त्यापासून हजारे नगर रस्ता तयार करण्यासाठी २३ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता. तर सिद्धिविनायक अपार्टमेंट ते कृष्णा पार्क या रस्त्याचे डांबरीकरण कामासाठी १८ लाखांचा निधी मंजूर आहे. तसेच बोपेले-नेरळ- कळंब रस्ता ते अनश रेसिडेन्सी येथील रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी नेरळ विकास प्राधिकरणकडून १७.९५ लाख निधी मंजूर आहे. या तिन्ही विकासकामांचा ठेका फायरविन इन्फ्राकोन सर्व्हिसेस या कंपनीने मिळविला आहे. काम करण्याचे कार्यादेश ऑगस्ट २०२३ मध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ विकास प्राधिकरणाकडून देण्यात आले आहेत. या रस्त्यांच्या कामांमध्ये मार्च २०२४ पूर्वी बोपेले भागातील तिन्ही रस्त्यांची कामे होऊन तेथील रहिवाशी यांना पक्क्या रस्त्याने ये-जा करता आली असती. मात्र, ही सर्व विकासकामे पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता.

फेब्रुवारी २०२४ मध्ये रस्त्याची कामे पूर्ण होणे अपेक्षित असताना आज एप्रिल २०२४ मध्येदेखील रस्त्यांच्या कामासाठी केवळ सिमेंट पाईप आणून टाकण्यात आले आहेत. त्याशिवाय अन्य कोणतीही कामे ठेकेदाराने पूर्ण केली नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या नेरळ प्राधिकरणने रस्ता खोदणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशीदेखील मागणी केली आहे. त्याचवेळी प्राधिकरणने त्या भागातील रहिवाशांची गैरसोय आठ दिवसांत दूर केली नाही तर मात्र आपण स्वतः नवव्या दिवशी रस्त्याचं सपाटीकरण करून रस्ता सुस्थितीत करणार, असा इशारा दिला आहे.

पान १ वरुन

## संजोग वाघेरे पाटलांचा उमेदवारी अर्ज दाखल

चिंचवड पुढे वीर चाफेकर बंधू स्मारक चिंचवड स्टेशन खंडोबा मंदिर आकुर्डी खंडोबा माळ चौक म्हाळसाकांत चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक आकुर्डी रेल्वे स्टेशन मिरवणुकीने पिंपरी चिंचवड येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या अर्ज भरण्याच्या मिरवणुकीमध्ये मावळ पिंपरी चिंचवड, कर्जत, खालापूर, पनवेल आणि उरणमधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. ही मिरवणूक अर्ज भरण्यासाठी नसून, विजयी मिरवणूक आहे, अशी चर्चा या परिसरामध्ये कार्यकर्ते आपापसात करत होते.

यावेळी शिवसेनेचे युवा नेते आमदार आदित्य उद्धव ठाकरे, काँग्रेसचे माजी अध्यक्ष माणिकराव ठाकरे, राष्ट्रवादीचे खा. अमित कोल्हे, राष्ट्रवादीचे आ. रोहित पवार, शिवसेनेचे आ. सचिन अहिर, माजी आ. बाळाराम पाटील, आ. संजय जगताप, रायगड काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दाखल केला.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे सध्याचे खासदार हे जनतेचे कामे करण्यासाठी अपयशी ठरले आहेत. आपल्यामतदारसंघातीलजेएनपीटीसारख्याआस्थापनाचे सीएसआर फंड स्थानिकांना उपयोगात न आणता तो बाहेर पाठवण्यात येतो, तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय लोकनेते दिवा पाटील साहेबांचे नाव लागावे यासाठी पाठपुरावा करण्यात ते अपयशी ठरले, याचमुळे उरण, पनवेल आणि कर्जतमधील प्रकल्पग्रस्त त्यांच्यावर नाराज आहेत आणि याचा फटका त्यांना येत्या निवडणुकीत बसेल.

## अटकेच्या भीतीमुळेच फडणवीसांनी फोडाफोडी केली

त्यांच्यावर खोटेनाटे आरोप करत त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आले. उद्धव ठाकरे यांचे सरकार देवेंद्र फडणवीस, आशिष शेलार यांना अटक करणार होते, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला आहे. फडणवीस यांच्या त्यांच्या मनात अटकेची भीती का आली, त्यांनी काहीतरी केले असणार म्हणूनच त्यांच्या मनात भीती आली, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

विनाकारण कोणलाही अटक करता येत नाही. देवेंद्र फडणवीस बेकायदा फोन टॅपिंगमध्ये दोषी आहेत. त्याचा तपास सुरू होता. त्यामुळे आपल्याला अटक होईल, अशी भीती त्यांच्या मनात होती. आपण गुन्हा केला आहे, ही भावना असल्यानेच त्यांच्या मनात अटकेची भीती होती. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री पदावर असताना विरोधकांचे फोन टॅप करून माहिती मिळवण्यासाठी त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना कामाला लावले होते. त्यातील रश्मी शुक्ला यांच्यावरचे आरोप मागे घेण्यात आले. ते मागे का घेण्यात आले. चौकशी पूर्ण झाल्यावर सत्य सर्वांसमोर आले असते. त्यामुळे त्यांच्या मनात भीती होती, असेही संजय राऊत म्हणाले.

फोन टॅपिंगचा गुन्हा गंभीर आहे. इतर देशात अशा आरोपांसाठी तात्काळ अटक करण्यात येते. असा गंभीर गुन्हा त्यांनी केल्यानेच त्यांच्या मनात भीती होती. ते डरपोक आहेत. आपल्याला अटक होऊ नये, यासाठीच त्यांनी शिंदेंवर दबाव आणून पक्ष फोडले. स्वतःचा बचाव करण्यासाठी आणि अटक टाळण्यासाठी त्यांनी फोडाफोडीचे राजकारण करत उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले, असेही संजय राऊत म्हणाले.

प्रवीण दरेकर यांची मुंबई बँक लोन घोटाळ्याची चौकशी सुरू होती. तिथे हजारो कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. १०,१५ लाखांच्या घोटाळ्यासाठी भाजपने अनेकांना अटक केली. असे असताना या दोघांना अटक का करण्यात आली नाही, भाजपचे नेते कायद्यापेक्षा मोठे आहेत का, असा सवालही त्यांनी केला. फडणवीस, शेलार, गिरीष महाजन, प्रसाद लाड या सर्वांची चौकशी सुरू होती. दुसऱ्यांवर आरोप करणाऱ्या शिंदे यांना विचारा की मोदी सरकार त्यांना अटक का करणार होते, असा सवाल त्यांना विचारा. तुम्ही आमदार फोडून आमच्यासोबत या, अन्यथा तुम्हाला अटक करण्यात येईल, असा दबाव फडणवीस आणि मोदी सरकारने मिंध्यांवर आणला होता. हा सर्व खेळ भाजपने केला आहे, असा आरोपही संजय राऊत यांनी केला आहे.

काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज बाद करून भाजपचा उमेदवार विजयी झाला आहे. हा बिनविरोध विजय नसून ही लूट आहे. याआधी आपल्या लोकशाहीत असे घडले नव्हते.सूरतमध्ये लोकशाहीचे वस्त्रहरण करण्यात आले आहे. त्यामुळे देशातून हुकूमशाही नष्ट झाली पाहिजे, यासाठी आमची लढाई सुरू आहे. केंद्रात १०० टक्के सत्तापरिवर्तन होणार आहे. शिंदे, फडणवीस टोळी सत्तेत आल्यावर त्यांनी गुन्हे, चौकशा रद्द केल्या होत्या. आता सत्तापरिवर्तन झाल्यावर या चौकशी पुन्हा सुरू करून कायदेशारी कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा संजय राऊत यांनी दिला आहे.

## श्रमिकांनी लढा जिंकला

जानेवारी रोजी ई-रिक्षा हातरिक्षा चालकांना देण्यात याव्यात, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. त्याचवेळी सनियंत्रण समितीला ई-रिक्षांची संख्या निश्चित करणे व त्यांची मार्गिका ठरविण्यास सांगितले होते. त्यानुसार सनियंत्रण समितीने दि ६ मार्च रोजी झालेल्या बैठकीत पहिल्या टप्प्यात वीस ई-रिक्षांची परवानगी देऊन अहवाल न्यायालयाला सादर केला. मात्र, सनियंत्रण समितीच्या मिनिट्समध्ये २० ई-रिक्षांचे वर्गीकरण १५ विद्यार्थ्यांना व ५ स्थानिकांना असे करून प्रामुख्याने या ई-रिक्षाच्या सेवेत पर्यटकांचा उल्लेख न केल्याने तर्क-वितर्क सुरू झाले होते. श्रमिक रिक्षा संघटनेचे वकील ॲड. ललित मोहन यांनी ई-रिक्षाची सेवा स्थानिक व पर्यटकांनादेखील देण्याची मागणी केली.

पर्यटन हाच येथील प्रमुख उद्योग असून, दरवर्षी दहा लाख पर्यटक माथेरानला भेट देतात. कायद्यात समानता आहे, वाहतूक ही अत्यावश्यक सेवा असल्याने कोणत्याही समूहाला डावलता येत नाही, तसेच वीस हात रिक्षाचालकांनी ई-रिक्षा खरेदी केल्या असून, पर्यटकांना सेवा दिली तरच त्यांना उत्पन्न मिळू शकते, ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. न्या. बी.आर. गवई व न्या. संदीप मेहता यांनी ई-रिक्षाची सेवा स्थानिक व पर्यटकांना दिली जाईल, असा स्पष्ट आदेश दिला आहे. जे परवानाधारक हातरिक्षा चालक आहेत, यांनाच परवानगी द्यावी, या चालकांचा सविस्तर अहवाल एक महिन्याच्या आत न्यायालयाला सादर करण्याचे राज्य सरकारने आदेश दिले आहेत. त्यामुळे लवकरच हात रिक्षा चालकांच्या ई-रिक्षा माथेरानच्या रस्त्यावर धावताना दिसणार आहेत. न्यायालयात ॲड. ललित मोहन यांच्यासोबत ॲड. विधे वैश्य व ॲड. आकांक्षा यांनी, तर अश्वपाल संघटनेसाठी श्याम दिवाण यांनी युक्तिवाद केला होता.

पहिल्या टप्प्यात वीस ई-रिक्षांना मिळालेली परवानगी ही हातरिक्षा चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्तीची सुरुवात आहे व लवकरच उर्वरित ७४ हातरिक्षा चालकांनादेखील ई-रिक्षाची परवानगी मिळेल. ई-रिक्षामुळे त्यांना आरोग्यदायी व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळणार आहे.

**- सुनील शिंदे, याचिकाकर्ते व सचिव, श्रमिक रिक्षा संघटना माथेरान**

## मैदानासाठी राडा!

(दि. २३) मैदानाची पाहणी करण्यासाठी जात असताना आमदार बच्चू कडू यांना पोलिसांनी रोखले. त्यामुळे घटनास्थळी मोठी गोंधळ निर्माण झाला. तसेच आमदार बच्चू कडू आणि पोलिसांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. यावेळी बच्चू कडू यांनी दावा केला आहे की, २२ आणि २३ एप्रिलसाठी अमरावतीतील सायन्स कोर मैदान बुक केले आहे. त्यामुळे दोन दिवसांसाठी मैदानावर इतर कोणाचाही कार्यक्रम किंवा सभा होऊ नये, अशी कडू यांची मागणी आहे.

दरम्यान, आता याच मैदानावर गृहमंत्री अमित शहा यांची सभा होणार आहे. त्यामुळे भाजपने सभेसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यामुळे आपल्याला सभेची परवानगी मिळालेली असताना मैदानावर भाजपचा हस्तक्षेप कसा? हे पाहण्यासाठी गेल्यानंतर आमदार बच्चू कडूंना पोलिसांनी अडवले. त्यानंतर कडू व त्यांच्या कार्यकर्त्यांसह पोलिसांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली.

PNP

**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY'S**
**ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE.**
**VESHVI-ALIBAG-402201.**

**WALK-IN-INTERVIEW**

VENUE: Prabhakar Patil Education Society's,
Arts, Commerce & Science College.
Veshvi-Alibag-402201
Director Office.

DATE: 27th April 2024
TIME: 11:00 A.M.
Contact: 8482867876

**Junior College Marathi & English Medium**
**Permanently Unaided**

| Sr.No. | Subject | Cadre | Qualifications | Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Biology (Botany/Zoology) | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 2 | Physics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 3 | Mathematics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 4 | Computer Sci. | Asst.Teacher | M.Sc./MCA/B.E/M.C.M. | 2 |
| 5 | Chemistry | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 6 | Hindi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 7 | Marathi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 8 | Geography | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 9 | English | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 10 | Political Science | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 11 | History | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 12 | Commerce | Asst.Teacher | M.com.B.Ed. | 2 |
| 13 | Economics | Asst.Teacher | M.A./M.com.B.Ed. | 1 |

The eligible and desirous candidates should write hand written application on plane paper and submit it before or on the date of interview along with attested Xerox copies of the testimonials. The candidates are requested to prepare a demo lesson on their own subject.
*Note - Travelling Allowance will not be given.

Sd/SECRETARY.

**(Mrs.Chitralekha N. Patil)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030067** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-70/ 2023 - 2024.** RFx e-tender for AMC for work of overhauling/ repairing of T/F and ICT Cooling Fan at various substations under EHV (O&M) Division Panvel**…4th call.** **Tender amount Rs. 5,00,000/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **24.04.2024, 18:00 Hrs. to 01.05.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.05.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.05.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. गजानन गोविंद पाटील,२) सौ.शैलजा उर्फ कल्याणी कृष्णा म्हात्रे,३) सौ. लिला उर्फ समिधा नंदकुमार पाटील,४) सौ. सरोज सदानंद पाटील,५) श्री. सचिन सदानंद पाटील,६) सौ. मंदा किरण पाटील, ७) श्री. रोहित किरण पाटील व ८) श्री. वैभव किरण पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरवून उभयपक्षीयांच्यामध्ये रितसर संमतीज्ञापन (MOU) स्वाक्षरीत करण्यात आला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| झिराड | ४११ | ०-७५-५० | १७.६५ |

पो. ख.०-०४-७०
०-८०-२०
पैकी पुर्वेकडील ० हे. ६०.२० आर एवढी मिळकत.

**सदर मिळकतीच्या चतु:सीमा:-**
पूर्वेस :- मौजे झिराड जुना गट नं. ५७० या मिळकतीचीहद्द.
पश्चिमेस :- मौजे झिराड गट नं. ४११ पैकी उर्वरित मिळकत व जुना झिराड गट नं. ५९२ या मिळकतीची हद्द.
दक्षिणेस :- मौजे झिराडची शिव व मौजे झिराडपाडा गट नं. १७५ या मिळकतीची हद्द.
उत्तरेस :- मौजे झिराड जुना गट नं. ५९२ व ५९३ या मिळकतींच्या हद्दी.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २४/४/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# प्रशासनाची निवडणूक कामाची लगबग

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**एकीकडे मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जनजागृती मोहीम सुरू असताना दुसरीकडे मतदानाच्या दिवशी लागणाऱ्या साहित्याची जुळवाजुळवही केली जात आहे. यामध्ये मतदान शाईचाही समावेश आहे. रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांत एकूण सात हजार शाईच्या बाटल्या लागणार आहेत. या लोकशाही उत्सवात मतदारांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.**




रायगड लोकसभा मतदारसंघ हा रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये विभागलेला आहे. या ठिकाणी दुर्गम, अतिदुर्गम भाग असल्याने अशा ठिकाणी मतदान केंद्रात पोहचण्यासाठी व्यवस्था केली जाणार आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात तिसऱ्या टप्प्यातील निवडणूक ७ मे रोजी होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून निवडणूक आयोगाचे निर्देश आणि मार्गदर्शनाखाली काम सुरू केले आहे. यासाठी सामानांची केंद्रावर ने-आण सुरू आहे. यात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या शाईच्या बाटल्याही मागवल्या जाणार आहेत. प्रत्येक मतदार केंद्रात दोन शाईच्या बाटल्या असणार आहेत. निवडणुकीची धामधूम सुरू असताना जिल्हा प्रशासनानेही कामकाज जोरात सुरू केले आहे. नवमतदार, मतदार ओळखपत्र फोटो, पत्ता दुरुस्ती; तसेच अन्य तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यात मोहीम राबवण्यात आली होती. सोमवारी नोंदणीचा शेवटचा दिवस होता. नवीन मतदारही वाढले आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क नवमतदारांना बजावता येणार आहे.

> जिल्हा प्रशासनाकडून निवडणुकीचे काम सुरू आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. हा आपला लोकशाही उत्सव आहे. मतदानाचा हा अधिकार आपल्याला प्राप्त झाला आहे. त्यामुळे मतदारांनी लोकशाही उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे.
>
> \- किशन जावळे , जिल्हाधिकारी

### पोलिसांना प्रशिक्षण

*निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांना प्रशिक्षण दिले जात आहे. याशिवाय, मॉकड्रिलही केले जात आहे. ज्यात विविध प्रात्यक्षिके केली जात असून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे.*

### रायगड लोकसभा मतदारसंघावर दृष्टिक्षेप

*मतदार – १६ लाख ६८ हजार ३७२*
*मतदान केंद्र – २ हजार १८५*
*शाईच्या बाटल्या – ७ हजार*
*कर्मचारी –१७ हजार ५१८*

## खर्चविषयक तक्रारीच्या निवारणासाठी समिती गठीत

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
रायगड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत उमेदवारांच्या खर्च विषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी खर्च नियंत्रण समित्ती गठीत करण्यात आली आहे.

या खर्च नियंत्रण समितीमध्ये खर्च निरीक्षक धिरेंद्र मनी त्रिपाठी, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे आणि राहुल कदम हे खर्च संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत.

पहिली तपासणी- २५ एप्रिल २०२४, वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५, दुसरी तपासणी- ३० एप्रिल २०२४, वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५, तिसरी तपासणी-४ मे २०२४, वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ होणार आहे. सर्व उमेदवारांनी आपल्या प्रचार मोहिमेच्या कालावधीतील सर्व लेखे, खर्चाच्या नोंदवह्या अद्ययावत करून नमूद केलेल्या तारखांना राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे तपासणीसाठी सादर करावेत.

लोकसभा मतदारसंघ अंतर्गत उमेदवारांची भरारी पथकाने जप्त केलेली रोख रक्कम परत करण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी (अध्यक्ष) भरत बास्टेवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (निमंत्रक) राहुल कदम, जिल्हा कोषागार अधिकारी (सदस्य) देविदास टोंगे हे समितीमध्ये आहेत.

## ‘आचारसंहिता भंग’ नियंत्रण कक्ष स्थापन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्याल आली आहे. रायगड आणि मावळ लोकसभा मतदार संघामधील विधानसभा मतदार संघामध्ये नागरिकांकडून येणाच्या आदर्श आचारसंहिता भंगाविषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. विधानसभा मतदार संघ- १८८ पनवेल, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२२-२७४५२३९९, १८९-कर्जत, नियंत्रण कक्ष क्रमांक ९३७३९२२९०९, १९०-उरण, नियंत्रण कक्ष क्रमांक ९८९२५३८४०९, १९१-पेण, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२१४३. २५३०३२, १९२- अलिबाग, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२१४१-२२२०४२, १९३- श्रीवर्धन, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२१४७-२२२२२६/७२४९५७९१५८, १९४-महाड, नियंत्रण कक्ष क्रमांक ७३८५८१५२१०, २६३- दापोली, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२३५२-२२६२४८,२६४- गुहागर, नियंत्रण कक्ष क्रमांक ०२३५६-२६४८८८

त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयात निवडणूकीसंदर्भात नागरिकांकडून येणाऱ्या आदर्श आचारसंहिता भंगाविषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याचा जिल्हा संपर्क केंद्र क्र. १९५० असा आहे. तसेच नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२०९७ हा आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी तथा समिती प्रमुख आदर्श आचार संहिता समिती रायगड लोकसभा मतदार संघ डॉ. संदिपान सानप यांनी दिली.

### कार्यकर्ते आनंदित

**कामोठे :** मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा कार्यक्षेत्रात प्रचाराचा धडाका सुरू आहे. त्यामुळे आता निवडणुकीमुळे अडगळीत पडलेल्या विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस आले आहेत. कार्यकर्ता नाराज होणार नाही यासाठी नेते मंडळीकडून खबरदारी घेतली जात आहे. निवडणूक तोंडावर आल्यामुळे दीड-दोन वर्षांपासून अडगळीत पडलेल्या कार्यकर्त्यांची आस्थेने विचारपूस करण्यात येत आहे.

## खारघरमधून संजोग वाघेरे यांना प्रतिसाद

### शिवसेना शहर प्रमुख गुरुनाथ पाटील

**। पनवेल । वार्ताहर ।**
मावळ लोकसभा मतदारसंघाचे खारघर हे प्रवेशद्वार आहे. या विभागात महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना प्रतिसाद मिळत असल्याची भूमिका शिवसेनेचे खारघर शहर प्रमुख गुरुनाथ पाटील यांनी मांडली. गेल्या दहा वर्षात खारघर विभागात डोकावून देखील न बघणारे विद्यमान खासदार यांच्यावर मतदार नाराज असल्याचा दावाही केला आहे.



आपली भूमिका मांडताना गुरुनाथ पाटील म्हणाले की, माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी एकदा नव्हे तर दोनदा खासदारकी उपभोगली. परंतु कार्यकर्त्यांच्या लोकाभिमुख कार्यक्रमांनादेखील उपस्थिती दर्शविण्याचे कष्ट घेतले नाहीत. माझ्यासारख्या विभाग प्रमुखांच्या प्रती जर का अशी वागणूक असेल तर विचार करा सामान्य माणसांना काय न्याय देत असतील? विद्यमान खासदारांच्या खोटेगिरीचा बुरखा फाडताना त्यांनी अनेक दाखले दिले. केंद्रीय विहारमध्ये पेवर ब्लॉक आणि श्री स्टार हॉटेलसमोर निवारा शेड उभारण्यासाठी तगादा लावला होता. केवळ कागदी घोडे नाचवल्यानंतर २०१९ लोकसभा निवडणुकांच्या वेळी त्यांच्या अहवालात बिनदिक्कतपणे येथे निवारा शेड उभारली असे लिहून लोकांची दिशाभूल केली आहे.

### पोलिसांची कारवाई

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल आऊट ऑपरेशन राबवून मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रेकॉर्डवरील २४ आरोपी तपासले असता त्यापैकी १९ आरोपी मिळाले. हिस्ट्रीसिटर तपासले असता ४ सापडले. ५ जणांना अजामीन पात्र वॉरंट बजावण्यात आले. १३ जामीनपात्र वॉरंट, ३३ समन्स आणि ५१ जणांवर कारवाई करण्यात आली. तीन ठिकाणच्या नाकाबंदी दरम्यान १७५ वाहने तपासण्यात आली.



## ‘एर्नाकुलम’मधून दारू जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**
निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेल्वे पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम राबवून एर्नाकुलम ओख एक्सप्रेसमधून दारू जप्त केल्याने अश्याप्रकारे बेकायदा दारुची ने-आण करणाऱ्यांवर चपराक बसली आहे.

उत्पादन शुल्कच्या पथकाने पनवेल रेल्वे स्टेशन फ्लॅट नं.०५, ट्रेन क्र. १६३३८, एर्नाकुलम ओख एक्सप्रेसमधील इंजिन पासून दुसरा जनरल डब्यात दारुबंदी कायद्यांतर्गत झडती घेतली असता. त्यावेळी बॅगेच्या मालकीबाबत विचारणा केली असता. त्या ठिकाणी कोणीही मालकसमोर आलेले नाही. सदर बॅग पंचासमक्ष उघडून त्यामध्ये काय आहे ते पाहिले असता त्यामध्ये विविध बँडच्या १८० मिलीच्या ५२५ सिलबंद बाटल्या असल्याचे व सर्व प्रकारच्या मद्याच्या बाटल्यांवर गोवा राज्य विक्रीकरिता असा मजकूर नमूद निदर्शनास आले. विनापरवाना परराज्यातीत विदेशी मद्याचा १८,९५० रूपये किंमतीचा दारूबंदी गुन्ह्याचा मुद्देमाल मिळून आला. आरोपीने रेल्वे पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर विभाग, यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने गुन्हा नोंद केला आहे. पर राज्यातील विदेशी मद्य ट्रेनमध्ये आढळल्यामुळे व त्याच्या पुढील तपासातून गुन्हेगारांना जरब बसण्यासाठी रेल्वे पोलीस राज्य उत्पादन शुल्काने धडक शोध मोहिमेअंतर्गत रेल्वेत मद्य पकडल्यामुळे गुन्हेगारांवर दहशत निर्माण होणार आहे.

## जनता दारिद्र्यरेषेखाली तरी मोदी विश्वगुरु

### अनंत गीतेंचा मोदींवर जोरदार निशाणा

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**
इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू आहे. मतदारसंघात गीतेंच्या सभांना जबरदस्त गर्दी दिसून येत आहे. उल्का महाजन यांच्या सक्षम नेतृत्वात सर्वहारा जन आंदोलन संलग्न भारत जोडो अभियान रायगड, मतदार जागृती मेळावा इंदापूर येथे घेण्यात आला.



यावेळी अनंत गिते म्हणाले की भाजपकडून देशात विकासाचा केवळ भ्रम निर्माण केला जातं आहे. जाहिरातबाजी करून देशातील जनतेची फसवणूक केली जातं आहे. जन-तेला मोफत धान्य देण्याची घोषणा केली जात आहे. मोफत अन्नधान्य हा मोहजाळ आहे, जनतेला मोह दाखवला जातो, जस उंदराला खाद्य दाखवून लालच दाखवून पिंजऱ्यात अडकवले जाते. सापळा रचला जातो तसाच हा सापळा सुरु आहे. मासा जसा गळाला लावला जातो, तस काम या देशात सुरु आहे. देशातील ८० कोटी जनता दारिद्र्य रेषेखाली आहे, अन्नासाठी मौताद आहे आणि म्हणे विश्वगुरु असा टोला अनंत गीतेंनी मोदींना लगावला.

यावेळी सुभाष देसाई म्हणाले की, २०२४ ची लोकसभा निवडणूक भ्रष्टाचार विरुद्ध सदाचार अशी आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचा घोटाळ्याचा एक डाग ही ज्यांच्यावर नाही असा स्वच्छ चरित्र्याचा लोकप्रतिनिधी संसदेत पाठवा. यावेळी देसाई यांनी सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टिकास्त्र सोडले.

उल्का महाजन म्हणाल्या की, देश विघातक वळणावर पोहचला आहे. आपल्याला जगणे मुश्किल होणार आहे. आपल्याला सन्मानाने जगायचे असेल तर इंडिया आघाडीची सत्ता आली पाहिजे. लोकशाही, संविधान आणि आपले हक्क अधिकार वाचवायचे असतील तर भाजपला तडीपार करा असे आवाहन या सभेत करण्यात आले.

## कमळ पतसंस्थेमध्ये मतदान ‘परिष्कार’ अभियान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
२०२४ साली येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मतदान परिष्कार हे अभियान राबवित आहे. लोकांना मतदानाकरिता अधिकाधिक उद्युक्त करणे तसेच मतदानाप्रति असणारी नागरिकांची उदासीनता कमी करणे हे ह्या अभियानाचे मुख्य ध्येय आहे.

कमळ नागरी पतसंस्थेमध्ये नागरिकांना मतदानाकरिता जागरूक करण्याकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. ह्या चर्चासत्राकरिता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी अजय मूर्ते, रविकिरण काळे, अमेय केळकर, कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, वरिष्ठ शाखा व्यवस्थापक देवेंद्र कारुळकर, हरेश पोवळे उपस्थित होते. मतदार यादीत आपले नाव समाविष्ट केले आहे का इथपासून ते मतदान करताना आपण काय जागरूकता दाखवली पाहिजे, चिन्हाचा उपयोग केल्याने होणारे दुष्परिणाम, तसेच आपल्या एका मताची असलेली लोकशाहीमध्ये किंमत ह्या सर्व विषयांवर तपशीलवार माहिती अजय मूर्ते यांनी दिली.

## स्थिर सर्व्हेक्षण पथक सक्रिय

**माणगाव :** उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून मतदारावर प्रभाव टाकण्यात येतो. यासाठी निवडणूक आयोगाने रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी स्थिर सर्व्हेक्षण पथके तैनात करण्यात आली असून ती सक्रीय झाली आहेत. त्यामुळे मतदारावर प्रभाव टाकणाऱ्या पैसे, वस्तू यावर निवडणूक आयोगाच्या पथकाची करडी नजर राहणार आहे.

पुणे - माणगाव मार्गावर रायगड हद्दीत ताम्हिणी घाट, माणगाव - दिघी रस्त्यावर मोर्बा व मुंबई गोवा महामार्गावर लोणेरे येथे एक असे तीन स्थिर सर्व्हे क्षण पथके काम करीत आहेत. ही पथके वाहन संशयास्पद आढळून आल्यास त्यांना थांबवून त्या वाहनाची तपासणी करीत आहेत. त्यामुळे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या पक्ष, उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले आहे.

## शिवाजीराव जाधव मावळ लोकसभा लढवणार

**। पनवेल । वार्ताहर ।**
ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे उमेदवार शिवाजीराव जाधव हे मावळ लोकसभा निवडणूक २०२४ लढवणार आहेत. याची माहिती त्यांनी पनवेल येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.




मावळ लोकसभा मतदारसंघातील ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, शेतकरी कामगार पक्ष, भारत राष्ट्र समिती पार्टी तसेच मावळा संघटना, महाराष्ट्र सावकार ग्रस्त शेतकरी समिती, क्रांती सूर्य सोशल फाऊंडेशन आणि क्षत्रिय मराठा फाऊंडेशन यांचे २०२४ लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी पुरस्कृत लोकप्रिय उमेदवार शिवाजी जाधव यांची उमेदवारी जाहीर केली असून ते येत्या २४ एप्रिल रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत यांची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेला उमेदवार शिवाजीराव जाधव यांच्यासह विजय मोहिते, चंद्रशेखर पाटील, रुपाली पाटील, महेश खडे, प्रकाश पाटील आदींसह इतर पाठिंबा देणारे इतर पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आगामी होणारी निवडणूक ही दुरंगी नसून तिरंगी आहे. माझ्याकडे शासकीय सेवेचा अनुभव आहे तसेच अनेक संस्थांवर मी काम केले आहे. मी उच्च शिक्षित असल्याने मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग आमच्या पाठीशी उभा आहे. त्याचे रूपांतर मतदानामध्ये होणार आहे. भ्रष्ट्राचार, महागाई यामुळे जनता त्रस्त झाली असून त्यांचा आवाज म्हणून लोकसभेत जाणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३
- बाईक व लाईसन्स आवश्यक किमान १२ वी पास. १) अलिबागमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, २) पेणमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, ३) रोहा/माणगाव मोबाईल सेल्स व डिल्हीवरी पार्ट टाईम, फुल टाईम, पगार १०,००० पासून पुढे. मोबाईल - ८८८८२२०२२१
- शिवानी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६
- विद्यानगर चेंढरे येथे 3BHK Semi-Furnished फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र :- १५६० चौ.फूट बिल्टअप संपर्क : PRO-LOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- ‘इंद्रप्रस्थ’ गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.
- 250 Sq/ft Gala for sale, shivaneri Appt.Near Vardhaman sale's- Alibag Revas - Road. East & Road facing. Mo. 9423377572 / 9028493434.
- अलिबागमध्ये घरकामासाठी बाई पाहिजे वेळ: ८-३० ते ५-३० कॉन्टॅक्ट मो. + ९१ ९५४५८४७२१२
- रेवदंडा येथे बाजारपेठेत भातगिरणीची जागा शेडसहीत विकणे आहे. एरिया- ४.५० गुंठे (NA) संपर्क : मोतीलाल जैन- ८४४६८८००२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## कांदळेपाडा ग्रामस्थ १०० टक्के करणार मतदान

**। पेण । प्रतिनिधी ।**
कांदळे ग्रामस्थांनी लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निवेदन उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पेण यांना १२ एप्रिल रोजी देण्यात आला आले होते. १६ एप्रिल रोजी कांदळे ग्रामस्थांसोबत झालेली बैठक राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी उपस्थित नसल्याने निष्फळ ठरली होती. परंतु आज झालेल्या बैठकीत राष्ट्रीय महामार्ग



प्राधिकीकरणाचे अधिकारी व्ही.बी.सिंघ, निखिल कुमार, प्रांत अधिकारी प्रविण पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी शिवाजी फडतडे, पोलिस निरिक्षक देवेंद्र पोळ, आणि सरपंच कादळे, ग्रामस्थ कांदळेपाडा यांच्या उपस्थितीमध्ये तातडीने कांदळेपाडा गावातील सर्विस रोड आणि गटारांच्या कामांची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आणि तातडीने अधिकारी वर्ग घटनास्थळी पोहचून पहाणी केली.

कांदळेपाडा ग्रामस्थांच्या मुख्य मागणीला सरकारने सकारात्मक पाठिंबा दर्शवून कामाला सुरूवात केल्याने हया ग्रामस्थांनी येत्या निवडणुकीत मतदानावर टाकलेला बहिष्कार मागे घेतला असून कांदळे ग्रामस्थ १०० टक्के मतदान करणार असल्याची ग्वाही प्रांताधिकारी प्रविण पवार यांना दिली.

## मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**। रायगड । प्रतिनिधी ।**
लोकसभा मतदारसंघासाठी मतदान ७ मे रोजी होणार असून यासाठी प्राप्त मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे, निवडणूक निरीक्षक संजीव कुमार झा, निवडणूक खर्च निरीक्षक धीरेंद्रमणी त्रिपाठी यांच्या उपस्थितीत राजस्व सभागृहात संपन्न झाली.

मतदान प्रक्रियेसाठी मतदार संघात एकूण ३ हजार ४७ बॅलेट युनिट, ३ हजार ४७ कंट्रोल युनिट व ३ हजार २०६ व्हीव्हीपॅट प्राप्त प्राप्त झाले आहेत. त्याची प्रथम सरमिसळ प्रक्रिया यापूर्वी झाली आहे. आजच्या प्रक्रियेदरम्यान मतदार केंद्र निहाय देण्यात येणाऱ्या मतदान यंत्राच्या क्रमांकाची इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सरमिसळ प्रक्रिया करण्यात आली.

## ‘उमेदवारांनी आयोगाच्या सूचनांचे पालन करावे’

**। रायगड । प्रतिनिधी ।**
भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणूक कालावधीत उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीने काय करावे काय करू नये याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. या सर्व नियमानुसार प्रचार, त्या अनुषंगाने विविध प्रकारच्या परवानग्या, तसेच प्रचार खर्चाबाबत कार्यवाही करावी. तसेच प्रचारा दरम्यान निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे प्रतिपादन निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीतील उमेदवार व खर्च प्रतिनिधींचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहमध्ये आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी निवडणूक निरीक्षक सर्वसाधारण संजीव कुमार झा, निवडणूक खर्च निरीक्षक धीरेंद्रमणी त्रिपाठी, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा खर्च सनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी राहुल कदम, आदर्श आचारसंहिता कक्षाच्या नोडेल अधिकारी जोत्स्ना पडीयार यांच्यासह राजकीय पक्षाचे उमेदवार व प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक शासकीय यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांसाठी सहकार्याच्या भूमिकेतून काम करतील. प्रशिक्षण काळजीपूर्वक समजून घेवून आयोगाच्या नियम पालनास प्राधान्य द्यावे. निवडणूक विषयक विविध शासकीय विभागाचे समन्वय अधिकारी नेमण्यात आले असून जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष, माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती तसेच खर्च पथक कार्यरत आहेत, असे जावळे यांनी सांगितले. प्रत्येक मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर निवडणुकीच्या अनुषंगाने खर्च पथक नेमण्यात आले आहेत, असेही ते म्हणाले.

निवडणूक प्रचारासाठी वाहने, मिरवणूक, सभा आदी परवानगी अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रचार ६ रोजी सायंकाळी सहा वाजता थांबणार आहे. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रचार करता येणार नाही. परंतू वृत्तपत्रातून मतदानाच्या दिवशी व त्याच्या आदल्या दिवशी जाहिराती जिल्हा माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समितीकडून प्रमाणित करून प्रसिद्ध करता येईल, असे जावळे यांनी सांगितले. यावेळी आदर्श आचारसंहिता, होम व्होटिंग, मॉक पोल, ई व्हो एम सरमिसळ, प्रचार खर्चासाठी विविध दरसुची, निवडणूक प्रचार कार्यालय, मतदानसाठी ओळखपत्र अथवा ओळखपत्राचे पर्यायी १२ पुरावे, मतदानाच्या दिवशी उभे करायाचे बूथ, मतदान केंद्र राजकीय प्रतिनिधी याबाबतची माहिती देण्यात आली.

# कर्जतमध्ये हनुमान जयंतीचा उत्साह

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील प्रत्येक गावात हनुमान जयंतीच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तालुक्यातील प्रत्येक गावात हनुमंताचे मंदिर आहेत तेथे सकाळी पाळणा हलवून भगवान हनुमानाचे जन्म साजरा करण्यात आला. हनुमानाच्या प्रतीमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल १) श्री. उमेश प्रभाकर राव, २) श्रीमती. वर्षा उमेश राव, दोघेही रा. आरएच-१७, ईटर्णिटी कनकिया स्पेसेस, टाटा मोटर्स मागे, तीन हात नाका, ठाणे पश्चिम - ४००६०४ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार | पोट खराबा |
|---|---|---|---|---|---|
| रामचंद्र गजानन गुरव | ६८ | १/ब | ०.२६.३० | ३.०० | ०.०१.५० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख :- २४/०४/२०२४

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि.रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री. तानाजी काशीनाथ शिंदे, २) श्री. संभाजी काशीनाथ शिंदे, ३) श्री. बाळकृष्ण काशीनाथ शिंदे, ४) श्री. रंभाजी काशीनाथ शिंदे, ५) श्री.रमेश काशीनाथ शिंदे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३२ | २२ | १-५८-०० | ०-६९ |
| ३२ | २६ अ | ०-२४-०० | ०-१२ |
| ३२ | २६ ब | ०-२५-०० | ०-१६ |
| ४० | १५ अ | १-६७-०० | ०-८९ |
| ४० | १६ | १-०४-०० | ०-८७ |
| ४० | १७ अ | ०-४४-५० | ०-४२ |
| ४० | १८ | ०-४६-०० | ० -५३ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २४/०४/२०२४.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९८५०४०२६५७.

## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिल १ अंकुश अनंत म्हात्रे व निलेश शिवराम हाटले यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक १. रोहिणी रघुनाथ कुंभार उर्फ पालवणकर, २. रोशन रघुनाथ कुंभार उर्फ पालवणकर यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी तोंडी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड | ७/६/१२/१/अ/ १२/४/४ | २-७८-०० | २७.८० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २४-०४-२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयाजवळ अलिबाग, ता. अलिबाग
जि. रायगड, मो.नं.९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल ऋषिकेश अरुण गायकवाड रा. कुशिवली ता. कर्जत मोबा नं.७३७८६९७६७६ यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक दिनेश नामदेव भगत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७१/२ | ०-३२-०० | ५-७५ |
| ७१/५ | ०-३०-०० | ३-८५ |
| ७२/८/अ | ०-३६-०० | ३-३२ |
| ७३/७ | ०-१४-०० | २-५० |
| ७४/२ | ०-०९-०० | १-६२ |
| ७५/३ | ०-१८-०० | ३-२५ |
| ७५/४ | ०-१०-०० | १-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २४/०४/२०२४ ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| शरद संभाजी म्हसे<br>गणेश संभाजी म्हसे | १०२ | ३/ब/२/२ | १-६७-०० | ०-८० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी
दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २४/०४/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.चंदू लालचंदानी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| अ.क्र. | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | ४६ | १६ | १.०८.०० |
| २ | ५२ | १ | ०.०५.०० |
| ३ | ५२ | ३/अ | ०.३१.६० |
| ४ | ५२ | ३/ब | ०.३९.९० |
| ५ | ५३ | १ | ०.२३.५० |
| ६ | ५४ | १ | ०.१२.०० |

जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक २४/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव, ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-आंबिवली त. कोतलखलाटी तालुका कर्जत**
**जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नेहल किशोर मेहता व मनिष किशोर मेहता | ६३/५/ब | २-१३-०० | १-३७ |
| नेहल किशोर मेहता व मनिष किशोर मेहता | ६३/६ | ०-३८-०० | ०-३७ |
| नेहल किशोर मेहता व मनिष किशोर मेहता | ६१/३/अ | ०-५८-५० | ०-३८ |
| हितेश विजय मेहता | ६१/१/अ | १-००-०० | ०-६० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २४/०४/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविणेत येते की,

आमचे अशिल श्री. यशवंतसिंग गंगाराम ठाकूर, रा. कन्हैय्या बंगला, श्रीबाग नं. २, अलिबाग यांनी १) श्रीमती सुजाता प्रभाकर गोंधळी, २) श्री. सुरज प्रभाकर गोंधळी, ३) कु. श्रुती प्रभाकर गोंधळी, रा. नवेनगर कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे अविभक्त सामाईक मालकीच्या खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील त्यांचे अविभक्त हिश्श्याची व ताबेकब्जा वहिवाटीतील मिळकत आमचे अशिलांस विकत देण्याचे ठरवून तसा नोटराईज्ड साठेकरार दि. १४/८/२०२३ रोजी बयाणापोटी रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे लाभात लिहून दिलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे | सत्ताप्रकार |
|---|---|---|---|---|
| कुरुळ ता. अलिबाग | २ | ०-५७-०० | ११.८० | वर्ग-२ |

(सदर मिळकतीपैकी १) सुजाता प्रभाकर गोंधळी, २) सुरज प्रभाकर गोंधळी ३) कु. श्रुती प्रभाकर गोंधळी यांच्या अविभक्त हिश्श्याची मिळकत.)

सदर मिळकत ही नियंत्रीत सत्ता प्रकारची असल्याने त्या मिळकतीची विक्री करणेपूर्वी घ्यावी लागणारी कूळ कायदा कलम ४३ खालील आवश्यक ती परवानगी मिळवून सदर मिळकतीतील १) सुजाता प्रभाकर गोंधळी, २) सुरज प्रभाकर गोंधळी ३) कु. श्रुती प्रभाकर गोंधळी यांनी त्यांचे अविभक्त हिश्श्याची असणारी मिळकत नोंदणीकृत खरेदीखताने विकत देण्याची जबाबदारी स्विकारलेली होती. आमचे अशिलांनी त्यांचेकडे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करुन देणेची मागणी केली असता १) सुजाता गोंधळी, २) सुरज गोंधळी, ३) श्रुती गोंधळी यांनी सदर व्यवहार पूर्ण करणेस जाणून बुजून टाळाटाळ चालविलेली असून त्यांचे अविभक्त हिश्श्याची मिळकत आमचे अशिलांचे अपरोक्ष त्रयस्थ इसमांस विक्री अथवा तत्सम मार्गाने हस्तांतरीत करण्याचे बेकायदेशीर प्रयत्न चालू केल्याची माहिती अलिकडेच आमचे अशिलांस मिळालेली आहे. आमचे अशिल व १) सुजाता प्रभाकर गोंधळी, २) सुरज प्रभाकर गोंधळी ३) कु. श्रुती प्रभाकर गोंधळी यांचेमध्ये दि. १४/८/२०२३ रोजी झालेला साठेकरार आजही अस्तीत्वात आहे. त्यामुळे सुजाता गोंधळी, सुरज गोंधळी व श्रुती गोंधळी हे आमचे अशिलांचे हक्क डावलून त्रयस्थ इसमांचे लाभात करु पहात असलेल्या बेकायदेशीर विक्री व्यवहारास आमचे अशिलांची कडक हरकत आहे.

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीमधील सुजाता गोंधळी, सुरज गोंधळी, श्रुती गोंधळी यांचे अविभक्त हिश्श्याचे मालकीचे मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा विक्री, दान, गहाण, साठेकरार, लिन, फरोक्त आदी प्रकारच्या हस्तांतरणाचा व्यवहार करु नये त्यास आमचे अशिलांची कडक हरकत आहे व आमचे अशिलांची हरकत डावलून तसा कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार कोणीही केल्यास तो आमचे अशिलांवर बधंनकारक राहणार नाही व आमचे अशिल त्याबाबत संबंधितांवर योग्य ती न्यायालयीन कारवाई करतील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे कळावे.

अलिबाग दि. २३/०४/२०२४

सही/-
ॲडव्होकेट
**(श्री. उमेश बाळकृष्ण म्हात्रे)**
'बोफोर्स', श्रीबाग नं. २,
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| रघुनाथ दशरथ म्हसे<br>छबूबाई तानाजी राऊत<br>गिता जनार्दन म्हसे<br>प्रशांत जनार्दन म्हसे<br>प्राची जनार्दन म्हसे<br>चिंतामण दशरथ म्हसे | १०२ | ३/ब/२/१ | १-६७-०० | ०-८० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २४/०४/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. संजय मेघनाथ पारकर, उर्मिला बब्रुवाहन पारकर, रा. नांदईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग व श्री. विजय कृष्णा कदम, रा.-अलिबाग व इतर यांची सामाईक मालकीची मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत व वर्कस जमीन मिळकत अशी आहे. सदर जमीन मिळकत ही कुळार्जित आहे. माझे अशिलांस असे समजण्यात आले की, सदर जमीन मिळकतीचे काही सहमालक हे जमीन विक्री करु पाहत आहेत. माझ्या अशिलांची सदर मिळकतीमध्ये अविभक्त हिस्सा आहे. तरी याउपर इतर सहमालकांनी माझ्या अशिलांना डावलून जमीन विक्री केल्यास त्यास माझ्या अशिलांची सक्त हरकत राहणार आहे व माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. माझे अशिल सदर जमीन मिळकत विक्री करणाऱ्यांवर दिवाणी व फौजदारी स्वरुपाची केस दाखल करतील यांची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| नांदईपाडा ता.अलिबाग जि.रायगड | ८९ | ४ | ०-२०-५०<br>०-०२-३० पो.ख.<br>०-२२-८० एकूण | ४.०५ |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २४-०४-२०२४

**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
साईलिला सी.एच.एस.,'अे विंग'
श्रीबाग, चेंढरे, ता. अलिबाग
जि. रायगड
मो.नं.९८२२७९६८३०

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. संजय मेघनाथ पारकर, उर्मिला बब्रुवाहन पारकर, रा. नांदईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग व श्री. विजय कृष्णा कदम, रा.-अलिबाग व इतर यांची सामाईक मालकीची मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत व वर्कस जमीन मिळकत अशी आहे. सदर जमीन मिळकत ही कुळार्जित आहे. माझे अशिलांस असे समजण्यात आले की, सदर जमीन मिळकतीचे काही सहमालक हे जमीन विक्री करु पाहत आहेत. माझ्या अशिलांची सदर मिळकतीमध्ये अविभक्त हिस्सा आहे. तरी याउपर इतर सहमालकांनी माझ्या अशिलांना डावलून जमीन विक्री केल्यास त्यास माझ्या अशिलांची सक्त हरकत राहणार आहे व माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. माझे अशिल सदर जमीन मिळकत विक्री करणाऱ्यांवर दिवाणी व फौजदारी स्वरुपाची केस दाखल करतील यांची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| नांदईपाडा ता.अलिबाग जि.रायगड | ८९ | ७ | ०-४५-२०<br>०-०३-००(पो.ख.)<br>०-४८-२० एकूण | ९.२० |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २४-०४-२०२४

**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
साईलिला सी.एच.एस.,'अे विंग'
श्रीबाग, चेंढरे, ता. अलिबाग
जि. रायगड
मो.नं.९८२२७९६८३०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन:-**

**१) मौजे - अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. / प्लॉट नं. | क्षेत्र आर. चौ.मी | आकार रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. नविनकुमार सिंघ | १४ | १४ | २२.००.०० | २२० | ०० |
| | १४ | १५ | २४.००.०० | २४० | ०० |
| | १४ | १७ | ३५.००.०० | ३५० | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- फ्लॅट नं. ४, ए विंग, पहिला मजला,
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २४/०४/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ईमेल :-adv.jayeshmhase@gmail.com


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/९०५/सन २०२४ दिनांक : २२/०४/२०२४

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

अर्जदार गायत्री २ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे, श्री स्वामी समर्थ मठाशेजारी, पिंपळभाट, सर्वे नं. ५६/३. पो. ता. अलिबाग, जि. रायगड यांनी १) श्रीमती पमीदेवी उधाराम चंदनानी यांचे वारस श्री. अमोल विजय नाईक, १.१) श्री. नारायण उधाराम चंदनानी १.२) श्री. दिपक उधाराम चंदनानी १.३) श्री. दिलीप उधाराम चंदनानी १.४) श्रीमती जया राम कोटवानी, सर्वजन राहणार पत्ता - बॅरॅक नं. ४८३/१०, उल्हासनगर, ता. उल्हासनगर, जि. ठाणे २) श्रीमती पमीदेवी उधाराम चंदनानी तर्फे अखत्यारी श्री. राम सन्मुखदास माखेजा, पत्ता- फ्लॅट नं. ४, ज्योती अपार्टमेंट, पिंपळभाट, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १९ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मोजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ५६/३/अ/३ क्षेत्र ३१४.०० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी क्र. ०१.१.१ ते १.४ व ०२ यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरच्या नोटीस Not Delivered Addressee left without instructions अशा शेरा मारुन परत आलेल्या असल्याने त्यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ३०/०४/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १६.०४.२०२४

सही/-
**(प्र.का. जगताप)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल ऋषिकेश अरुण गायकवाड रा. कुशिवली ता. कर्जत मोबा नं.७३७८६९७६७६ यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक तानाजी नथू पालकर इतर ३४ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे -मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९०/२ | ०-५१-०० | ९-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २४/०४/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**अर्जदारातर्फे वकील ॲड. गौरव शिरीष लेले**

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो. यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.७४/२०२४

नि. ७/०

१) सौ. स्वाती शिरीष लेले
(पूर्वाश्रमीची उज्वला नारायण गाडगीळ)
उ.व. ६४ वर्ष, धंदा - वकिली,
रा. १४०४, श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ... अर्जदार
२)श्री. सुनील नारायण गाडगीळ
उ.व. ५९ वर्ष, धंदा-नोकरी,
रा. १२, भागीरथी निवास,
न. चि. केळकर मार्ग, दादर (प.),
मुंबई -४०००२८
विरूध्द
कोणीही नाही. सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येते की, कै. सुनीता नारायण गाडगीळ हे दि. २५/०८/२०२३ (पंचवीस ऑगस्ट दोन हजार तेवीस) रोजी मयत झाली. त्यामुळे तिचे कायदेशीर वारस सौ. स्वाती शिरीष लेले वगैरे १ यांनी अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सो. यांचे कोर्टात कै. सुनीता नारायण गाडगीळ हिच्या मालकी हक्काच्या खालील निवासी सदनिकेबाबत व अर्जातील अर्ज कलम २अ व २ब मध्ये नमूद केलेल्या कारणांकरीता बॉम्बे रेग्युलेशन VIII नुसार वारस दाखला मिळण्याकरीता दिवाणी चौ. अर्ज क्र. ७४/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे अलिबाग नगरपालिका हद्दीतील सदनिका**

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | मजला नं., फ्लॅट नंबर व विंग | अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र.(नवा) | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | चिरायू को. ऑप. हौ. सो. | दूसरा मजला, फ्लॅट नं. ११ ए विंग | ए.एल.बी. ००००१८७२ | ३५.०७ चौ.मी. |

सदरचे अर्जास कोणाला हरकत घेणेची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत वर नमूद मा. कोर्टात हजर राहून आपली हरकत दयावयाची आहे. याव्दारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमूद कालावधीत योग्य त्या हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर मा. कोर्टात वरील अर्जदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने पुरावा घेण्यांत येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यांत येईल व अर्जदार हे कै. सुनीता नारायण गाडगीळ यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यांना वारस दाखला देण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २०/०४/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर,**
**रायगड - अलिबाग,**

**कोर्टाचा शिक्का**

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर,**
**रायगड - अलिबाग.**

www.krushival.in
बुधवार, दि. २४ एप्रिल, २०२४
कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


**निवडक**

### इम्पॅक्ट प्लेयरला विरोध

**मुंबई :** ऍरॉन फिंच आयपीएलमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रभावशाली खेळाडू नियमाच्या विरोधात आहे. खराब रणनीतीने मैदानात उतरलेल्या संघाच्या उणिवा यातून अधोरेखित होत नाहीत, असे तो म्हणाला. भारताचा कर्णधार रोहित शर्मा काही दिवसांपूर्वी म्हणाला होता की इम्पॅक्ट प्लेयर नियम काढून टाकला पाहिजे. फिंचने सहमती सांगितले की आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इम्पॅक्ट प्लेयर नियम अस्तित्वात नाही. त्यामुळे कर्णधारांना रणनीती बनवण्यात अडचणी येतात.

### रिझवानची तुलना ब्रॅडमनशी!

**लाहोर :** पाकिस्तानचा यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवाननं अलीकडेच आतंरराष्ट्रीय टी क्रिकेटमध्ये सर्वात जलद ३००० धावा करण्याचा विश्वविक्रम केला. पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीनंही रिझवानचं अभिनंदन केलं. मात्र आता त्याचं अभिनंदन करणं आफ्रिदीला महागात पडल आहे. कारण त्याने अभिनंदन करताना मोहम्मद रिझवानची तुलना चक्क सर डॉन ब्रॅडमनशी केली! यावरून चाहते आता शाहीन आफ्रिदीला प्रचंड ट्रोल करत आहेत.

### शर्माचा बळींचा 'पंच'

**जयपूर :** राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्सच्या सामन्यात गोलंदाज संदीप शर्माने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट गोलंदाजी केली. मुंबई इंडियन्सविरुद्ध संदीप शर्मानं ४ षटकांमध्ये १८ रन देऊन ५ बळी घेतले. त्याने ईशान किशन, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, टिम डेव्हिड आणि जेराल्ड कोएत्झी यांना आपले शिकार बनवले. संदीप शर्मा म्हणाला की, मी फिट झाल्यानंतर माझा पहिला सामना खेळत होतो. खेळपट्टी संथ होती. त्यामुळे माझी योजना व्हेरिएशन करण्याची आणि कटर बॉल टाकण्याची होती.

### राजस्थानचा सलग तिसरा विजय

**जयपूर :** राजस्थान रॉयल्सने सलग दुसऱ्यांदा तिसरा विजय मिळवला आहे. संघाने मोसमातील ३८ व्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा ९ गड्यांनी पराभव केला. राजस्थानचा १७ व्या मोसमातील हा ७ वा विजय होता, यासह रॉयल्स संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला. मुंबई ५वा सामना हरला. जयपूरच्या स्टेडियमवर मुंबईने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ९ बाद १७९ धावा केल्या. राजस्थानने १८० धावांचे लक्ष्य १८.४ षटकांत एक गडी गमावून पूर्ण केले.

### महिला संघाचे स्वागत

**ढाका :** भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या बांगलादेश दौऱ्यावर असून तिथे पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ मंगळवारी बांगलादेशच्या धरतीवर दाखल झाला. भारतीय संघातील शिलेदारांचे बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वागत केले, ज्याची झलक त्यांनी शेअर केली आहे. २८ एप्रिलपासून या मालिकेला सुरुवात होईल. २८ एप्रिल ते ९ मे या कालावधीत ही मालिका खेळवली जाणार आहे. भारतीय संघ २३ एप्रिलला बांगलादेशात पोहोचला.

## टी-२० विश्वचषक स्पर्धा

# 'वंदे मातरम' राष्ट्रीय गीताचा व्हिडीओ प्रोमो



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या आयपीएलचा थरार सुरु आहे. आयपीएलनंतर लगेचच आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ होणार आहे. १ जूनला अमेरिका आणि कॅनडा यांच्यात पहिला सामना होणार आहे. भारतीय संघाचा पहिला सामना आयर्लंडविरुद्ध रंगणार आहे. हा सामना ५ जून रोजी न्यूयॉर्कमध्ये होईल. तर भारताचा दुसरा सामना पाकिस्तानसोबत होणार आहे. टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर स्टार स्पोर्ट्सने एक व्हिडीओ प्रोमो प्रसिद्ध केला आहे. या व्हिडीओ वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत आहे. यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा दिसत आहे. हा व्हिडीओ प्रोमो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तसेच हा व्हिडीओ बघून भारतीयांच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहणार नाही.

### विश्वचषकासाठी पात्र ठरलेले २० संघ...

अमेरिका, वेस्ट इंडिज, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, नेदरलँड्स, न्यूझीलंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, आयर्लंड, स्कॉटलंड, पापुआ न्यू गिनी, कॅनडा, नेपाळ, ओमान, नामिबिया, युगांडा

### गटवारी

अ – भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका
ब – इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, नामिबिया, स्कॉटलंड, ओमान
क – न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, अफगाणिस्तान, युगांडा, पापुआ न्यू गिनी
ड – दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, नेदरलँड्स, नेपाळ

### भारतीयसंघाचेवेळापत्रक

५ जून – वि. आयर्लंड, न्यू यॉर्क
९ जून – वि. पाकिस्तान. न्यू यॉर्क
१२ जून – वि. अमेरिका, न्यू यॉर्क
१५ जून – वि. कॅनडा, फ्लोरिडा

### १० जणांची नावं जवळपास निश्चित

रोहित शर्मा, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, अर्शगीप सिंग, कुलदीप यादव, रवींद्र जाडेजा, हार्दिक पांड्या, ऋषभ पंत

### टी २० विश्वचषकासाठी भारताचे संभाव्य १५ शिलेदार

रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, ऋषभ पंत, संजू सॅमसन/केएल राहुल, रिंकू सिंह/शिवम दुबे, रवींद्र जडेजा,अक्षर पटेल, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल/रवि बिश्नोई, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंह

# आता वजन राखण्याचे आव्हान- विनेश फोगट

**। बिश्केक । वृत्तसंस्था ।**

अनेक अडथळयांची आव्हाने पार करून ऑलिम्पिक कोटा मिळविल्याचा विनेश फोगट निश्चित आनंदी असेल, पण आता आराम करून चालणार नाही. ऑलिम्पिकपर्यंत पुढील चार महिने मला वजन राखण्याची कसरत करावी लागेल, असे मत विनेशने व्यक्त केले.

विनेशने वैयक्तिक आयुष्यातील संकटांवर मात देत सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक कोटा मिळवला. कुस्ती महासंघाच्या विरोधात शड्डू ठोकल्यानंतर जवळपास दीड वर्षे ती मॅट सरावापासूनही दूर राहिली होती. अशात तिच्या नेहमीच्या ५३ किलो वजनी गटातून अंतिम पंघालने ऑलिम्पिक कोटा मिळवला. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिक खेळण्याच्या उद्देशाने पेटून उठललेल्या विनेशने वजनी गट बदलून ५० किलोमधून खेळण्याचा निर्णय घेतला. यातही पहिला अडथळा पार करताना विनेशने आशियाई ऑलिम्पिक पात्रता फेरीत आपले निर्विवाद वर्चस्व राखले. विनेश म्हणाली, हे सारे अद्भुत आहे. मी कमालीची आनंदी आणि अधिक चांगल्या कामगिरीसाठी प्रेरित झाली आहे. कठोर मेहनत घेऊन मी वजन ५० किलोपर्यंत खाली आणले आहे. आता पुढील चार महिने ते टिकवून ठेवण्याचे मुख्य आव्हान मला पेलावे लागणार आहे. माझ्या शरीरातील पेशी झपाट्याने वाढतात. मी तंदुरुस्त दिसत असले, तरी माझ्याकडे पिळदार स्नायू असल्यामुळे वजन पटकन वाढते. मॅटवरील सरावाची मला चिंता नाही. माझ्याकडे फक्त चार महिने आहेत आणि काही करून मला वजन नियंत्रित करायचे आहे,असेही विनेशने म्हटले आहे.

## सोके कप कराटे स्पर्धा

# मुरूडच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

पनवेल येथे नुकत्याच झालेल्या ४थ्या सोके कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत मुरूडच्या विद्यार्थ्यांनी ४ सुवर्ण,२ रौप्य व २ कांस्य पदके पटकावत दमदार कामगिरी केल्याने सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

ही स्पर्धा गोशिन रियू कराटे-डो असोसिएशन इंडिया व शिहन - राजू कोहली यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धे साठी रायगड, मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यातून १२० हूनअधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातून विद्यार्थ्यांनी ४ सुवर्ण,२ रौप्य व २ कास्य पदके अशी एकूण ८ पदके पटकावत दमदार कामगिरी केली. त्याचप्रमाणे संघ चषक रायगड संघाने आपल्या नावे केले.




या स्पर्धेमध्ये उत्कृष्टरित्या कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांत शिवम अच्युत चव्हाण २ सुवर्ण पदक, शुभंकर सचिन राजे सुवर्ण व रौप्य पदक, देवांशू सचिन सोनावणे सुवर्ण व कास्य पदक, वरुण वि. कचरेकर रौप्य व कास्य पदक यांचा समावेश असून ओकिनावा रियू कियू शीतो रियू कराटे डो क्योकाई इंडिया या संस्थेच्या अंतर्गत विद्यार्थी सातत्याने सराव करीत आहेत तर या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक शिहान डॉ. आदित्य अनिल, सेंसाय. सनी रा.खेडेकर, सेंसाय शिवम धि. सिंह या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे प्रगती घुरुप, निषात विरकुड, अमृता पाटील, जैनेंद्र सिंह आदी पालक वर्गाने तसेच शीतो रियु कमिटी महाराष्ट्रने अभिनंदन करुन पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पुजाराने ससेक्सला काउंटीमध्ये मिळवून दिला विजय

### पहिल्या डावात ८५ धावा आणि दुसऱ्या डावात नाबाद ४४ धावा; ससेक्स ४ गड्यांनी विजयी

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

कसोटी विशेषज्ञ चेतेश्वर पुजाराने काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन-२ स्पर्धेत ८६ आणि ४४ धावांची खेळी खेळून आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.पुजारा कसोटी संघाबाहेर आहे.

त्याने ११ जून २०२३ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारतीय संघासाठी शेवटचा सामना खेळला. सध्या तो इंग्लंडमध्ये काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन-२ स्पर्धेत खेळत आहे. पुजारा ससेक्सकडून खेळत आहे.

रविवारी ग्लॉस्टरशायर आणि ससेक्स यांच्यात खेळल्या गेलेल्या स्पर्धेतील १२व्या सामन्यात पुजाराचे पहिल्या डावात शतक हुकले. पहिल्या डावात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने २१९ मिनिटे क्रीजवर घालवली. पुजाराने १४८ चेंडूंत ८ चौकार मारत ८६ धावा केल्या. त्याचे शतक हुकले. त्याला धावबाद होऊन पॅव्हेलियनमध्ये जावे लागले.



ग्लॉस्टरशायरने पहिल्या डावात ४१७ धावा केल्यानंतर ससेक्सने पहिल्या डावात ४७९ धावा केल्या.

पुजाराने दुसऱ्या डावात ४४ धावा करत ससेक्सला विजय मिळवून दिला. दुसऱ्या डावात ग्लॉस्टरशायर संघ दुसऱ्या डावात अवघ्या २०५ धावांत गडगडला. प्रत्युत्तरात १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ससेक्स संघ १५५ धावांवर ६ गडी बाद झाला.


त्यानंतर पुजाराने ससेक्सचा डाव सांभाळला आणि त्याने १२६ मिनिटे फलंदाजी करत १०२ चेंडूंत ५ चौकारांसह नाबाद ४४ धावा केल्या. या शानदार खेळीच्या जोरावर ससेक्सने हा सामना ४ गडी राखून जिंकला. पुजारा हा टेस्ट स्पेशालिस्ट मानला जातो. पुजारा २०१० ते २०१४ पर्यंत सतत आयपीएल खेळला. त्याने ३० सामन्यांत ३९० धावा केल्या आहेत. त्याची सरासरी २०.२५ होती.

# यशस्वीने शतकासह रचला इतिहास

**। जयपूर । वृत्तसंस्था ।**

यशस्वी जैस्वाल आपल्या उत्कृष्ट फलंदाजी कौशल्यासह आयपीएलमध्ये दुसरे शतक झळकावत सर्वांनाच प्रभावित केले आहे. सोमवारी राजस्थान विरूद्ध मुंबईमध्ये झालेल्या सामन्यात यशस्वी जैस्वालची बॅट पुन्हा एकदा चांगलीच तळपताना दिसली.

राजस्थानकडून सलामीला आलेला यशस्वी १०४ धावा करत संघाला विजय मिळवून देत नाबाद परतला. आयपीएलच्या सुरूवातीपासूनच खराब फॉर्मशी झुंजत असलेल्या यशस्वीवर संघाने विश्वास दाखवला आणि जैस्वालनेही त्यांना निराश न करता थेट शतकी खेळी करून दाखवली. यशस्वीने ६० चेंडूत ९ चौकार आणि ७ षटकार ठोकले आणि १७३.३३ च्या स्ट्राईक रेटने नाबाद १०४ धावा केल्या. या शतकी खेळीसह त्याने आयपीएलमध्ये एक ऐतिहासिक कामगिरी नावे केली आहे.



आयपीएलमध्ये दोन शतके झळकावणारा यशस्वी जैस्वाल हा सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे. वयाची २३ वर्षे पूर्ण होण्याआधीच यशस्वीने सर्वात कमी वयात दोन शतके झळकावण्याचा पराक्रम केला आहे. यशस्वीचे वय २२ वर्षे ११६ दिवस इतके आहे. या वयापर्यंत त्याने आयपीएलमध्ये दोन शतके झळकावली आहेत. आयपीएलमध्ये एवढ्या कमी वयात ही कामगिरी एकाही फलंदाजाला करता आलेली नाही. यशस्वीने हा दुर्मिळ विक्रम आपल्या नावावर केला आहे. राजस्थानच्या घरच्या मैदानावरील शतकापूर्वी यशस्वीने गेल्या वर्षी वानखेडेवर शतक झळकावले होते. योगायोगाने त्याचे पहिले शतकही मुंबई इंडियन्सविरुद्धचं होते. त्यावेळी त्याचे वय अवघे २१ वर्षे १२३ दिवस होते. तर आता दुसरे शतकही त्याने मुंबई इंडियन्सविरूद्धच झळकावले आहे.

## रायगड पॉवरलिफ्टींग स्पर्धेत

# अथर्व, आर्या, अमृता, संस्कार विजेते

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सब ज्युनिअर ,ज्युनिअर, पॉवरलिफ्टींग स्पर्धा वृंदावन बाबा सभागृह, सेक्टर ५ नवीन पनवेल येथे पार पडली. या स्पर्धेत अथर्व लोधी, आर्या शिंदे, अमृता भगत, सब ज्युनि.स्पर्धेत संस्कार सरदार हे विजेते झाले.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील महाड, माणगाव, कर्जत, खोपोली, पनवेल, पेण येथील खेळाडूंनी भाग घेतला होता. या सर्व स्पर्धकांना गुरूद्वारा, गुरुनानक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने लंगर सेवेद्वारे भोजन व्यवस्था केली होती.

स्पर्धा उद्घाटनास पनवेल तालुका कुणबी समाजाचे माजी अध्यक्ष रमेश फळसमकर, विद्यमान उपाध्यक्ष आणि पॉवर लिफ्टिंग रायगडचे कार्यकारिणी सदस्य सुभाष टेंबे, मुंबईचे पंच अंकुश सावंत, समीर दळवी, सुरेश धुळप, जितेंद्र यादव, सचिन भालेराव, संदीप पाटकर, राहुल गजरमल आदी उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन अंकुश सावंत यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेस नवनाथ गायकर, गणेश तोट, विक्रांत गायकवाड, बबन झोरे आणि कुणाल पिंगळे यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेत स्पर्धेचे सांघिक विजेतेपद आयर्न मेट जिम खोपोली आणि उपविजेतेपद संसारे फिटनेस पेण यांनी मिळविले.

# आधी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

भारत आणि पाकिस्तान क्रिकेट संघांत गेल्या जवळपास एक दशकात द्विपक्षीय मालिका झालेल्या नाहीत. पण आता याबाबत चर्चांना सुरुवात झाली आहे.

त्यातच भारताचा कर्णधार रोहित शर्माने एका मुलाखतीत पाकिस्तान संघाचे कौतुक करताना कसोटी मालिका खेळण्याबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिली होती. आता याबाबत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नाकवी यांनीही त्यांचे मत मांडले आहे.

■ **मोहसीन नाकवी यांचे मत**

त्यांनी द्विपक्षीय मालिका खेळण्याची तयारी दाखवली असली, तरी त्याआधी एक अटही ठेवली आहे. त्यांनी म्हटले आहे की पुढीलवर्षी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आधी भारतीय संघाने यावे, त्यानंतर याबाबत विचार करू. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार लाहोरमधील एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी बोलताना नाकवी यांना रोहित शर्माच्या द्विपक्षीय मालिकेबाबतच्या प्रतिक्रियेबद्दल विचारले.त्यावर ते म्हणाले, हे पाहा जर यासंबंधी जर काही पर्याय आमच्या समोर आले, तर आम्ही विचार करू.

सध्यातरी आमचे लक्ष चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करण्यावर आहे आणि आधी या स्पर्धेसाठी भारतीय संघाला येथे येऊ देत.सध्यातरी चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत कोणतीही जागा खाली नाहीये, आमच्या संघाचे तोपर्यंत वेळापत्रक व्यस्त आहे.

नाकवी पुढे म्हणाले, एकदा ते इकडे आल्यानंतर आम्ही आमच्या समोर आलेल्या प्रस्तावावर नक्कीच विचार करू.दरम्यान, पुढील वर्षी होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ पाकिस्तानला जाणार आहे की नाही, याबाबत अद्याप बीसीसीआयने भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे आता बीसीसीआय काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**तृतीय पुण्यस्मरण**



**कैं. लक्ष्मण दत्तू पिंगळे**
**स्वर्गवास – २४ एप्रिल २०२१**

ना ध्यानी, ना मनी, तुम्ही गेलात आम्हा सोडूनी
स्मृतीस तुमच्या वंदन करुनी, काय लिहावे उदास होऊनी
क्रूर नियतीने कसा केला घात,
आज नाहीत तुम्ही आमच्या सहवासात
तुमच्या पवित्र स्मृती आम्हा सर्वांची

**भावपूर्ण श्रद्धांजली**

पत्नी- विजया लक्ष्मण पिंगळे, मुलगे- जनार्दन, राजन सुना-ज्योत्स्ना, रिता नातसून- अंकिता मुली- मेघना, विणा, जयश्री जावई-मेघनाथ, विष्णू, राजेंद्र, समीर, महेंद्र, विनायक.
नातवंडे - मयुरी, परेश, स्नेहा, रोहित, प्रणाली, प्रतिक, मंजिरी, सोनल, साहिल, प्रणय, पतवंडे-नैतिक, ईश, अर्श, समस्त पिंगळे परिवार
मु.पो. कुईस, ता. अलिबाग, जि. रायगड

# आता विश्वविजेत्यासमोर गुकेशचे खडतर आव्हान : अभिजित कुंटे

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारताचा १७ वर्षीय युवा खेळाडू डी. गुकेश याने रविवारी झालेल्या लढतीत हिकारू नाकामुरा याला ड्रॉवर रोखले. याचसोबत इयान नेपोनियात्ची - फॅबियानो कॅरुअना यांच्यामधील लढतीही ड्रॉ राहिली.

गुकेशने एकूण नऊ गुणांसह आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्यपदाला गवसणी घातली. आता जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत चीनच्या डिंग लिरेन याच्यासमोर गुकेशचे खडतर आव्हान असणार आहे, असे मत अभिजीत कुंटे यांनी व्यक्त केले.

डी. गुकेश- हिकारू नाकामुरा यांच्यामध्ये १४व्या फेरीचा सामना रंगला. या फेरीमध्ये गुकेशने पहिल्या चालीपासून नाकामुरावर वर्चस्व गाजवले. त्यामुळे नाकामुराला डोकेवर काढण्याची संधी मिळालीच नाही. याच लढतीदरम्यान फॅबियानो कॅरुअना- इयान नेपोनियात्ची यांच्यामध्येही लढत पार पडली. या लढतीत दोघांपैकी एकाने विजय मिळवला असता तर टायब्रेकरमध्ये स्पर्धेचा विजेता ठरला असता. फॅबियानो याने या लढतीत वरचढ होण्याचा प्रयत्न केला; पण नेपोनियात्ची याने कडवी झुंज दिली.



### भविष्यात जगज्जेता अन् आव्हानवीर भारतीय असणार

भारतात सध्या युवा व गुणवत्ताप्रधान बुद्धिबळपटूंची कमी नाही. आर. प्रज्ञानंद हा कात टाकत आहे. आव्हानवीरांच्या स्पर्धेत त्याच्याकडून छान कामगिरी झाली नाही; पण त्याच्यामध्येही क्षमता आहे. डी. गुकेशने स्वत:ची कल्पकताही दाखवून दिली आहे. अर्जुन एरिगेसीही शर्यतीत आहे. भविष्यात जगज्जेता व आव्हानवीरांच्या स्पर्धेतील जेताही भारतातच असल्यास आश्चर्य वाटणार नाही. याचा अर्थ भारतातील दोन खेळाडूंमध्ये जगज्जेतेपदाची लढत रंगेल.

### एबासोव, फिरॉझाविरुद्ध विजय महत्त्वाचे

डी. गुकेशने आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील १४ फेऱ्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली; पण गुकेशने १२व्या व १३व्या फेरीत मिळवलेले विजय कलाटणी देणारे ठरले. गुकेशने १२व्या फेरीत निजात एबासोव याला, तर १३व्या फेरीत एलिरेझा फिरॉझा याला पराभूत केले. खरेतर एबासोव व फिरॉझा या दोन्ही खेळाडूंना या स्पर्धेमध्ये चमक दाखवता आली नाही; पण गुणांवर लक्ष देता गुकेशसाठी हे दोन्ही विजय अत्यंत महत्त्वाचे ठरले.

### वयाच्या नुसार परिपक्वता जास्त

डी. गुकेश हा वयाच्या १२व्या वर्षी ग्रँडमास्टर झाला. आता आव्हानवीरांची स्पर्धा जिंकण्यात त्याला यश मिळाले. यावरूनच बुद्धिबळातील त्याची मेहनत दिसून येते. त्याच्यामध्ये एक लक्षणीय बाब आहे. सध्या तो १७ वर्षांचा आहे. वयाच्या मानाने त्याच्यामध्ये अधिक परिपक्वता आहे. तो शांतचित्ताने बुद्धिबळ खेळावर लक्ष केंद्रित करतो, हीदेखील वाखाणण्याजोगी बाब आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)